cmyk

दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ०३ | अंक–३५४ | शनिवार दि.०६ एप्रिल २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | ▪ पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### अन्न वाया घालवणे हा नैतिक गुन्हा ठरावा !

अन्नाचा आदर करण्याच्या भारतीय परंपरेला संयुक्त राष्ट्र संघाच्या एका अहवालाने धक्का बसला आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाच्या (यूएनइपी) अहवालाने जगभरात १९ टक्के अन्न वाया जाते हे कटू सत्य उघड केले आहे. जगातील सुमारे ७८३ दशलक्ष लोक दीर्घकाळापासून उपासमारीने त्रस्त आहेत म्हणे. युद्धग्रस्त गाझा पट्टीत भुकेच्या संकटाचे हे भीषण वास्तव समोर आले आहे.

### मुनगंटीवार यांचा प्रचार रथ अडविला

चंद्रपूर : चंद्रपूर लोकसभा क्षेत्रातील एका गावातून भाजप उमेदवार सुधीर मुनगंटीवार यांचा प्रचार रथ हाकलण्यात आला आहे. गावात या प्रचाररथाने प्रवेश करताच गावकऱ्याने तो अडवला आणि आधी पंधरा लाख रुपये द्या, अशी मागणी केली. बोगस विकास आम्हाला नको. अजित पवार, अशोक चव्हाण यांच्यासारखे घोटाळेबाज या पक्षात गेले आणि यांचा प्रचार आमच्या गावात करता का, असा प्रश्न या गावकऱ्याने केला. चारशेचा गॅस सिलिंडर बाराशेवर नेऊन ठेवला. चला निघा इथून, असा दमही या गावकऱ्याने दिला. सध्या हा व्हीडीओ समाज माध्यमावर मोठा व्हायरल होत आहे. हा व्हीडीओ आर्णी तालुक्यातील खेडी (पुरुषोत्तम) येथील असल्याचे सांगितले जात आहे.

# मराठवाड्यात दोन कोटी ४३ लाख क्विंटल साखरेचे उत्पादन

## ६१ कारखान्यांपैकी ४४ कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम आटोपला

### ● लातूर जिल्ह्याचा उतारा सर्वाधीक तर बीडचा सर्वात कमी

**संभाजीनगर । प्रतिनिधी**

**मराठवाड्यातील यंदाच्या ऊस गळतात सहभागी ६१ कारखान्यांपैकी ४४ कारखान्यांचा ऊस गाळप हंगाम आटोपला आहे. गाळपात सहभागी होणाऱ्या कारखान्यांनी आजवर दोन कोटी ५३ लाख ८ हजार ३७५ टन उसाचे गाळप करत दोन कोटी ४२ लाख ७१ हजार ८६ क्विंटल साखरेचे उत्पादन केले. हे उत्पादन करताना लातूर जिल्ह्यातील कारखान्यांचा सरासरी साखर उतारा सर्वाधिक, तर बीड जिल्ह्यातील कारखान्यांचा सर्वात कमी राहिला आहे.**



यंदाच्या ऊस गाळपासाठी सहभागी होणाऱ्या ६१ कारखान्यांमध्ये धाराशिव जिल्ह्यातील १४, छत्रपती संभाजीनगरमधील ६, जालन्यातील ५, बीड व परभणीतील प्रत्येकी ७, हिंगोलीतील ५, नांदेडमधील ६ व लातूरमधील ११ कारखान्यांचा समावेश आहे. या कारखान्यांपैकी धाराशिवमधील १२, छत्रपती संभाजीनगरमधील ५, जालन्यातील १, बीड व परभणीतील प्रत्येकी ६, हिंगोलीतील ४, नांदेड व लातूरमधील प्रत्येकी ५ कारखान्यांचा गाळात आटोपला आहे. बहुतांश कारखान्यांचा गाळप हंगाम मार्चच्या अखेरीस, तर काही कारखान्यांचा गाळप हंगाम फेब्रुवारी अखेरीसच आटोपला होता. क्षमतेनुसार कारखान्यांचे होणारे गाळप पाहता जालना जिल्ह्यातील अंबड, घनसांगवी तालुक्यात साधारणतः ७५ हजार टन ऊस शिल्लक राहण्याची शक्यता आहे. शिल्लक राहणारा हा ऊस परभणी, बीड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर आदी जिल्ह्यांतील कारखान्यांच्या मदतीने संपविण्याचे नियोजन कारखाना व प्रशासन स्तरावर झाले आहे. साधारणतः १६ एप्रिलपर्यंत छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक साखर सहसंचालक कार्यालय अंतर्गत येणाऱ्या जिल्ह्यातील सर्व २२ कारखाने गाळप करून बंद होण्याची शक्यता साखर विभागाच्या सुत्रांनी व्यक्त केली आहे. नियोजित गाळप करूनही ऊस शिल्लक राहणाऱ्या जालना जिल्ह्यातील सर्वाधिक चार कारखान्यांच ऊस गाळप अजूनही सुरू आहे. याशिवाय परभणी, बीड, हिंगोली, छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांतील प्रत्येकी एका कारखान्याचा ऊस गाळप हंगाम अजूनही सुरू आहे. शिल्लक राहणाऱ्या उसाच्या गाळपासाठी मजुराचा प्रश्न ऐरणीवर आहे. वाढत्या उन्हामुळे मजुरांच्या ◀◀ पान २ वर

**जिल्हानिहाय कारखान्यांचा सरासरी साखर उतारा**

लातूर १०.६५. नांदेड – ९.९५. हिंगोली – ९.९४. छत्रपती संभाजीनगर – ९.७४. धाराशिव – ९.१९. परभणी – ९.९. जालना – ९.५. बीड– ८.२२.

# ज्योती मेटे यांचे बीड जिल्ह्यात शक्ती प्रदर्शन

### »वंचित आघाडीकडून लोकसभा निवडणूक लढवणार?

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाची उमेदवारी बजरंग सोनवणे यांना जाहीर झाल्यानंतर विनायक मेटे यांच्या पत्नी आणि शिवसंग्रामच्या नेत्या ज्योती मेटे यांनी शुक्रवारी जबरदस्त शक्ती प्रदर्शन करत बीड जिल्ह्यामध्ये गेवराई मार्गे आगमन केले. वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून बीड लोकसभा त्या लढवतील असे म्हटले जात असून त्यामुळे बजरंग सोनवणे यांना मोठा धक्का बसू शकतो.

ज्योती मेटे यांना शरद पवार महाविकास आघाडीची उमेदवारी देतील असे म्हटले जात होते. मात्र ऐनवेळी बजरंग सोनवणे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार या पक्षाची उमेदवारी ◀◀ पान २ वर




**विनायक मेटे यांच्या समाधी स्थळाचे दर्शन**

ज्योती मेटे या गेवराई वरून बीडमध्ये आल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम विनायक मेटे यांच्या समाधी स्थळी जावून दर्शन घेतले. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी केली.

**जेसीबीतून फुलांची उधळण अन् २०० गाड्यांचा ताफा**

ज्योती मेटे या संभाजीनगर वरून बीड कडे निघाल्या त्यावेळी त्यांच्यासोबत तब्बल २०० गाड्यांचा ताफा होता. तसेच गेवराईसह जागोजागी त्यांच्यावर जेसीबीच्या माध्यमातून फुलांची उधळण करण्यात आली.

# बीडमध्ये भाजपा महायुतीचे जिल्हा प्रचार कार्यालय; पंकजा मुंडे यांच्या हस्ते उद्घाटन

## बूथ प्रमुखांसह सुपर वॉरियर्ससोबत पंकजाताईंनी घेतली बैठक



**बीड । प्रतिनिधी**

**भारतीय जनता पार्टी आणि महायुतीच्या बीड येथील जिल्हा मध्यवर्ती प्रचार कार्यालयाचे उदघाटन भाजप महायुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते मोठया उत्साहात झाले. खा. डॉ.प्रीतमताई मुंडे यांच्यासह महायुतीचे सर्व जिल्हाप्रमुख आणि पदाधिकारी उपस्थित होते.**

बीड शहरातील जालना रोडवरील संचेती बिल्डींग, एम.एस.ई.बी. कार्यालयासमोर, भाजप महायुतीच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालय ◀◀ पान २ वर

**तुम्ही बुथ मजबुत करा, मी जिल्हा मजबूत करते**

जिल्हा प्रचार कार्यालयाच्या उद्घाटनानंतर पंकजाताई मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली बीड मतदार संघातील सर्व बुथ प्रमुख, शक्ती केंद्रप्रमुख, सुपर वॉरियर्स, जिल्हा, तालुका पदाधिकारी, सर्व आघाड्यांचे पदाधिकारी, नगरसेवक, जि.प. सदस्य, सरपंच, उपसरपंच तथा सर्व कार्यकर्त्यांची महत्वपुर्ण बैठक कै. तुकाराम गुरूजीनगर, मस्के कन्स्ट्रक्शन प्लांट, चऱ्हाटा रोड येथे संपन्न झाली. बुथ प्रमुखांना पंकजाताईंनी प्रचार आणि मतदानाच्या अनुषंगाने सूचना जोमाने काम करण्याचे आवाहन केले. तुम्ही बुथ मजबूत करा, मी जिल्हा मजबूत करते. जिल्हयाचा सर्वांगिण विकास आपणच करू शकतो. जास्तीत जास्त मतदारांपर्यंत पोहोचून प्रचार करा असं त्या म्हणाल्या. या बैठकीस महायुतीचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# भीमा कोरेगाव दंगल प्रकरणात शोमा सेन यांना सशर्त जामीन

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**भीमा कोरेगाव दंगल प्रकरणात कथित माओवाद्यांशी संबंध असल्याच्या कारणावरून गेल्या सहा वर्षांपासून तुरुंगात असलेल्या राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या माजी प्राध्यापिका आणि मानवाधिकार कार्यकर्त्या शोमा सेन यांना शुक्रवारी सर्वोच्च न्यायालयाने सशर्त जामीन मंजूर केला.**



शोमा सेन यांच्याविरुद्ध बेकायदेशीर कारवाया प्रतिबंधक कायदा १९६७ (युएपीए) अंतर्गत गुन्हा दाखल करून ६ जून २०१८ रोजी त्यांना अटक करण्यात आली होती. तेव्हापासून त्या तुरुंगात आहेत. त्यांच्या जामीन अर्जावर न्यायमूर्ती अनिरुद्ध बोस व न्यायमूर्ती ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठापुढे सुनावणी झाली. या सुनावणीत शोमा सेन या ६२ वर्षे वयाच्या असून त्यांना विविध आजार असल्याने आम्हाला त्यांच्या कोठडीची गरज नाही, असे राष्ट्रीय तपास संस्थेच्या (एनआयए) वकिलांनी न्यायालयाला सांगितले. ◀◀ पान २ वर

# यूपीत मदरशातील शिक्षण सुरुच राहणार

## अलाहाबाद हायकोर्टाच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाची स्थगिती

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**यूपी बोर्ड ऑफ मदरसा एज्युकेशन ॲक्ट २००४ घटनाबाह्य ठरवणाऱ्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या २२ मार्चच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने अंतरिम स्थगिती दिली आहे. मदरसा बोर्डाची स्थापना धर्मनिरपेक्षतेच्या तत्त्वांचे उल्लंघन करते असा अलाहाबाद उच्च न्यायालयाचा निष्कर्ष योग्य नाही, असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले आहे. तसेच उच्च न्यायालयाच्या २२ मार्चच्या आदेशाला आव्हान देणाऱ्या अपीलांवर सर्वोच्च न्यायालयाने नोटीसही बजावली आहे.**

अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या लखनौ खंडपीठाच्या यूपी बोर्ड ऑफ मदरसा एज्युकेशन कायदा २००४ घटनाबाह्य ◀◀ पान २ वर

**१७ लाख विद्यार्थी आणि १० हजार शिक्षक प्रभावित**

मॅनेजर्स असोसिएशन मदारिसची बाजू मांडताना वरिष्ठ वकील डॉ. अभिषेक मनू सिंघवी यांनी युक्तिवादादरम्यान म्हटले की, मदरसा व्यवस्था ही १२० वर्षांपासून अस्तित्वात आहे. पण आता ती अचानक विस्कळीत झाली आहे. यामुळे १७ लाख विद्यार्थी आणि १० हजार शिक्षक प्रभावित झाले आहेत. या विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना राज्याच्या शिक्षण व्यवस्थेत अचानक जुळवून घेणे अवघड आहे, असे सांगत त्यांनी उच्च न्यायालयाचा निर्णय ''आश्चर्यकारक'' असल्याचे म्हटले आहे.

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ एप्रिल २०२३**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : ३५.५० क्विंटल | २,२५० | ३,१४५ | २,६६६ |
| ज्वारी/हायब्रिड :२१७.५० क्विंटल | १,६०० | ३,५०० | २,६६८ |
| मूग :०.५० क्विंटल | ९,२०१ | ९,२०१ | ९,२०१ |
| तूर : ८५.५० क्विंटल | ६,००० | १०,३०३ | ९,१८८ |
| उडीद : २.०० क्विंटल | ७,३०० | ९,६०१ | ८,९७५ |
| बाजरी: ४.५० क्विंटल | २,७२१ | २,७२१ | २,७२१ |
| चिंचोका/लोकल: ११.०० क्विंटल | २,००० | २,००० | २,००० |
| सोयाबीन: १४२.०० क्विंटल | ४,५४० | ४,६०० | ४,५६३ |
| हरभरा: २२.५० क्विंटल | ५,३०० | ५,५२० | ५,४३० |

# पहिले पान ठेवून आतील संविधान गायब होईल

## विजय वडेट्टीवार यांचा मोदी सरकारवर गंभीर आरोप

**चंद्रपूर । वृतसंस्था**

**लोकसभेच्या निवडणुकीनंतर संविधानाचे पहिले पान कायम ठेवून आतील संविधान मोदी सरकार गायब करेल, असा गंभीर आरोप काँग्रेसचे विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी मोदी सरकारवर केला. चिमूर गडचिरोली लोकसभा क्षेत्राचे उमेदवार नामदेव किरसान यांच्या प्रचारासाठी क्रांतिभूमी चिमूर येथे आले असता पत्रकारांशी चर्चा करताना ते बोलत होते. यावेळी माजी आमदार अविनाश वारजुकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष सतीश वारजुकर, काँग्रेसचे उमेदवार नामदेव किरसान उपस्थित होते.**

विजय वडेट्टीवार सरकारला धारेवर धरताना म्हणाले, पिंजऱ्यातील पोपटाला उडता येत नाही. त्यामुळे मालक टाकेल, त्या दाण्यावर त्याला जीवन जगावे लागते, तशी देशातील लोकांची परिस्थिती होणार आहे. या निवडणुकीनंतर संविधानाचे पहिले पान जसाचे तसे ठेवून आतील संविधान गायब होईल, असा गंभीर आरोप त्यांनी केला. लोकशाहीत निवडून येवू, परंतु विरोधक दिसणार नाही, असे सांगून काँग्रेसची खाती गोठवली, नोटीसा पाठविल्या, नेत्यांवर कारवाई केली, ही कारवाई वरच्या इशाऱ्यावर होत आहे. आमच्या विरोधात बोलाल, तर आम्ही तुम्हाला सोडणार नाही, असा इशारा दिला जातो. परंतू आम्ही लोकशाही माणणारे आहोत. त्यामुळे त्या इशाऱ्याला ◀◀ पान २ वर

सुस्नेह निमंत्रण




वर्धापन दिनानिमित्त
चहापानचा कार्यक्रम
मंगळवार, दि.९ एप्रिल २०२४, वेळ सायं. ५ ते रात्रौ.११ वाजेपर्यंत
✲ स्थळ ✲
यशराज इन हॉटेल, जालना रोड, बीड

द्वितीय वर्धापन दिन

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा.. नवे विचार...
द्वितीय वर्धापन दिनानिमित्त

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर राज्य लोकतंत्र YouTube चॅनेलच्या माध्यमातून डिजीटल मीडियात पदार्पण


आदर्श शेतकरी आणि आदर्श सरपंच पुरस्कार वितरण सोहळा

शुभहस्ते : डॉ. ओमप्रकाशजी स. शेटे
प्रमुख,आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समिती, महाराष्ट्र शासन

प्रमुख उपस्थिती
मा. नंदकुमार ठाकूर – पोलीस अधिक्षक, बीड
मा. गौतमभाऊ खटोड – सामाजिक कार्यकर्ते, बीड
मा. दत्तामामा बारगजे – संचाल, इन्फंट इंडिया
मा. गोवर्धन दराडे – संचालक, पसायदान सेवा प्रकल्प
मा. एस.एम.देशमुख – मुख्य विश्वस्त, मराठी पत्रकार परिषद, मुंबई

स्वागतोत्सुक
सौ. सीमा गणेश मोकाशे जहागीरदार – संपादक, दै. राज्य लोकतंत्र
गणेश मोकाशे – निवासी संपादक, दै. राज्य लोकतंत्र
अशोक खाडे – कार्यकारी संपादक, दै.राज्य लोकतंत्र
अनिल जाधव – उपसंपादक, दै.राज्य लोकतंत्र
विशाल साळुंके – उपसंपादक, दै.राज्य लोकतंत्र

मुख्य आकर्षण



पश्चिम महाराष्ट्रात लोकप्रिय असलेला 'सातारा साज' संगीत रजनी कार्यक्रम

कार्यक्रम स्थळ :
यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, कॅनॉल रोड, बीड
सोमवार, दि. ८ एप्रिल २०२४, वेळ : सायं. ६ वा.

मुख्य कार्यालय : दै. लोकतंत्र, जाधव बिल्डिंग, दुसरा मजला, राजीव गांधी चौक, बीड. मो. ९७६७५३२६३५

cmyk

## अग्रलेख

# अन्न वाया घालवणे हा नैतिक गुन्हा ठरावा !

अन्नाचा आदर करण्याच्या भारतीय परंपरेला संयुक्त राष्ट्र संघाच्या एका अहवालाने धक्का बसला आहे. संयुक्त राष्ट्र पर्यावरण कार्यक्रमाच्या (यूएनइपी) अहवालाने जगभरात १९ टक्के अन्न वाया जाते हे कटू सत्य उघड केले आहे. जगातील सुमारे ७८३ दशलक्ष लोक दीर्घकाळापासून उपासमारीने त्रस्त आहेत म्हणे. युद्धग्रस्त गाझा पट्टीत भुकेच्या संकटाचे हे भीषण वास्तव समोर आले आहे. अहवालानुसार पुरेशी साधनसंपत्ती असूनही अन्नधान्याचे न्याय्य वितरण होत नाही. अन्नाची नासाडी होत असल्याने पर्यावरणाचा समतोलही बिघडत चालला आहे. अन्नसुरक्षेच्या दृष्टिकोनातून अन्नाची नासाडी हे मोठे आव्हान उभे राहिले आहे. भारतालाही ही समस्या छळते आहे. भारतात एकूण अन्नापैकी एक तृतीयांश अन्न सेवनापूर्वीच खराब होते म्हणे. एका अंदाजानुसार वर्षभरात प्रति व्यक्तीकडून सुमारे पन्नास किलो अन्नाची नासाडी होते. भारतात दरवर्षी सुमारे ७८ दशलक्ष टनाहून अधिक अन्न वाया जाते. म्हणजे दरडोई सरासरी ५५ किलो अन्न वाया जाते.

'फूड वेस्ट इंडेक्स रिपोर्ट'ने २०२१ मध्ये जो अहवाल दिला होता त्यानुसार प्रति व्यक्ती वाया जात असलेल्या अन्नाचा आकडा सरासरी ५० किलो इतका होता. २०२४ च्या अहवालानुसार त्यात आता दरडोई पाच किलोची वाढ झाली आहे. ही आकडेवारी घरांमध्ये होणाऱ्या अन्नाच्या नासाडीसंबंधीची आहे. देशातील २३.४ कोटी लोक कुपोषणाचे बळी आहेत. दुसऱ्या एका अहवालानुसार सुमारे ७४.१ टक्के भारतीयांना पोषक आहार मिळत नाही तरीही अन्नपदार्थांची नासाडी ही मोठी समस्या आहे. २०२३ च्या ग्लोबल हंगर इंडेक्सनुसार देशातील १६.६ टक्के लोकसंख्या कोणत्या ना कोणत्या स्वरूपाच्या कुपोषणाने ग्रस्त आहे. जागतिक भूक निर्देशांकात १२५ देशांच्या यादीत भारत १११ क्रमांकावर आहे. याचा अर्थ असा की, देशातील प्रत्येकाला अजूनही पुरेसा पोषण आहार मिळत नाही. देशातील कुपोषणाची समस्या अधिकाधिक गंभीर बनत चालली आहे. सुमारे १८.७ टक्के मुले अन्न नासाडीला बळी पडत आहेत. या मुलांचे वजन त्यांच्या उंचीनुसार कमी भरते. जागतिक आकडेवारीनुसार भारत या बाबतीत पहिल्या क्रमांकावर आहे. जागतिक आकडेवारीनुसार जगभरात एकूण अन्न उत्पादनाच्या १९ टक्के अन्न वर्षभरात वाया जाते.

जगातील ७८.३ कोटी लोकांना रिकाम्या पोटी झोपावे लागते. अहवालानुसार जगातील प्रत्येक व्यक्ती दरवर्षी सुमारे ७९ किलो अन्न वाया घालते. संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार भारतातील ७४ टक्के लोकसंख्येला सकस आहार परवडत नाही. अशी परिस्थिती असताना एक तृतीयांश टक्के अन्न वाया घालवणे हा नैतिक गुन्हा ठरतो. जगातील इतर देशांप्रमाणे भारतातही अन्न उत्पादन आणि कचऱ्याशी संबंधित हरितगृह वायू उत्सर्जनाचा पर्यावरणावर विपरीत परिणाम होत आहे. कचऱ्याच्या ढिगाऱ्यामध्ये खराब झालेले अन्नधान्य विघटित झाल्यामुळे ते मिथेन वायू उत्सर्जित करतात. त्यामुळे ग्लोबल वॉर्मिंग वाढण्यास मदत होते. म्हणूनच जागतिक अन्न प्रणालीमध्ये संपूर्ण परिवर्तन घडवण्याची गरज निर्माण झाली आहे. कोट्यवधी लोक अन्नासाठी संघर्ष करत असताना नैतिक दृष्टिकोनातून अन्नाची नासाडी करणे हा गुन्हा आहे हे मान्य असले तरी आज नैतिकता औषधाला तरी उरली आहे काय हा मुख्य प्रश्न आहे. या बाबतची ताजी घटना म्हणजे युद्धग्रस्त गाझापट्टीत 'वर्ल्ड सेंट्रल किचन' या मदत संस्थेचे सहा आंतरराष्ट्रीय मानवतावादी कार्यकर्ते आणि त्यांचा पॅलेस्टिनी वाहनचालक असे सातजण इस्रायलच्या हवाई हल्ल्यात ठार झाले.

गाझामध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे लाखो लोकांवर उपासमारीचे संकट ओढवले आहे. त्यांच्या मदतीसाठी 'वर्ल्ड सेंट्रल किचन' ही मदतसंस्था काम करते. ही संस्था १०० टनांपेक्षा जास्त अन्नसामग्री घेऊन निघाली होती. या मानवतावादी संस्थेवर हल्ला झाला. अन्न नासाडीच्या संकटावर मात करण्यासाठी राष्ट्रीय स्तरावर सर्वसमावेशक धोरणाची गरज आहे. त्यासाठी जनजागृती मोहिमा राबविणे, धोरणात्मक उपायांमध्ये बदल करणे आणि एकात्मिक प्रयत्नांद्वारे उपक्रम राबविण्याचे प्रयत्न केले पाहिजेत.

## वंजारवाडी येथे सांस्कृतिक कार्यक्रमाच्या बक्षीसातून दप्तर वाटप

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील वंजारवाडी येथील सांस्कृतिक कार्यक्रम बक्षीसातुन दप्तर वाटप . जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वंजारवाडी येथे दिनांक १३ मार्च २०२४ रोजी सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता, सदरील कार्यक्रमात जमा बक्षीसाच्या माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांना ०५ एप्रिल २०२४ रोजी दप्तर वाटप करण्यात आले होते. धामणगाव येथील युवा पत्रकार दादा त्रिंबकराव पवळ यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करण्यात आले.यावेळी शाळेच्या मुख्याध्यापिका कुलकर्णी मॅडम . सहशिक्षक हारकर सर . लोकनियुक्त सरपंच संजय महाजन.शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा सिता महाजन.चीतू महाजन . समाधान पवळ. पांडुरंग सकुंडे.सह शाळेतील विद्यार्थी ग्रामस्थ उपस्थित होते.



## लग्न सराईच्या काळात बाल विवाह आटोपल्यास अजामीन पात्र गुन्हा-जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यात बाल विवाह निर्मूलन अभियान अतिशय कडकडीने राबविण्यात येत आहे. सध्या लग्नसराईचा काळा सुरू आहे. या कालावधीत बाल विवाह होण्याची शक्यता नाकारता येत नाही. बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ संपूर्ण राज्यात लागू आहे. त्यानुसार बाल विवाह आयोजित करणे हा अजामीन पात्र गुन्हा असून या काळात बाल विवाह लावल्यास कायदेशीर कार्यवाहीस समोरे जावे लागेल. त्यामुळे बाल विवाह होऊ न देणे हे समाजाच्या विकासासाठी चांगले असल्याचे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी सुधीर ढाकणे यांनी पत्राव्दारे कळविले आहे.**



बीड जिल्हयात बाल विवाह होवू नये म्हणून आवश्यक त्या उपाय योजना करणे सुरू आहेत. बाल विवाह हि प्रथा बाल हक्काच्या विरोधी असून बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ नुसार असे बाल विवाह बेकायदा ठरतात. या विरोधात गुन्हा नोंदविला जाणे अपेक्षित आहे. तसेच सदर कायद्याच्या अमलबजावणी संदर्भात महिला व बाल विकास विभागाच्या अधिसूचनेनुसार ग्रामीण भागासाठी ग्रामसेवक, आणि शहरी भागासाठी बाल विकास प्रकल्प अधिकारी यांना बाल विवाह प्रतिबंधक अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आलेले आहे. बीड जिल्हयातील संबधित कार्यालय प्रमुख यांनी आपल्या अधिकार क्षेत्रात बाल विवाह होवू नये यासाठी प्रचार प्रसार, जागृती कार्यक्रम, प्रशिक्षण इत्यादी प्रतिबंधात्मक उपाय योजना कराव्यात. बाल विवाह कायद्याने गुन्हा आहे. बाल विवाहाचे आयोजन करणे, साखरपुडा करणे, लग्नाची बोलणी करणे, किंवा बाल विवाहाला प्रोत्साहन भेटल अशी कोणतेही कृती करणे याकरिता वधु व वर यांचे आई वडील, मामा मामी, इतर नातेवाईक भटजी, मंडपवाले, सजावटवाले, फोटोग्राफर, पाणीवाले, आचारी, व-हाडी मंडळी या सर्वावर बाल विवाह प्रतिबंधक अधिनियम २००६ मधील कलम ९ व १० मधील तरतूदी प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात येतो. सध्या लग्नसराईचे दिवस असल्याने मंगल कार्यालय मालक / व्यवस्थापक, धार्मीक स्थळांचे व्यवस्थापक, यांनी वर (मुलगा) व वधू (मुलगी ) यांच्या वयाची खात्री शाळा सोडल्याचा दाखला किंवा निर्गम उता-यावरुन करावी. असे आवाहन सुधीर ढाकणे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी बीड यांनी केले आहे. बाल विवाह होत असल्यास किंवा संकटग्रस्त बालकांसबंधी कोणतेही घटना लक्षात आल्यास त्याबाबत चाईल्ड लाईन बीड क्रं.१०९८ या टोल फ्री, क्रंमाकावर माहिती देण्यात यावी. माहिती देण्याऱ्यांचे नांव गोपनीय ठेवण्यात येते. अधिक माहितीसाठी अश्विनी जगताप जिल्हा समन्वयक जिल्हास्तरीय चाईल्ड हेल्प लाईन कक्ष बीड, वरद प्राईड कॉम्प्लेक्स पहिला मजला धानोरा रोड बीड (-२०२३.) या ठिकाणी संपर्क करण्यात यावा.

## दिंद्रुड येथे सैलानी बाबा संदल मिरवणुक उत्साहात

### अहिल्यानगर व लातूर च्या कव्वालांमध्ये रंगला कव्वालीचा शानदार मुकाबला

दिंद्रुड । प्रतिनिधी

**माजलगाव तालुक्यातील दिंद्रुड येथील बाबा सैलानी देवाची संदल मिरवणुक गावातून शोभेची दारू उडवत (दि०३) बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली. रात्री मंदीर परिसरात अहिल्यानगर व लातूर च्या कव्वालांमध्ये कव्वालीचा शानदार मुकाबला जल्लोषात रंगला होता.**



येथील मोहखेड रोड लगत सर्व धर्मीयांचे श्रध्दास्थान असलेल्या सैलानी बाबा देवस्थान च्या वतीने बुधवारी सायंकाळी पाच वाजता हार-फुले, चादर चढवून सजावट करत उंट व घोड्यावर देवाला मोठ्या थाटामाटात वाजतगाजत दिंद्रुड नगरीतून संदल मिरवणूक काढण्यात आली. तर दुसऱ्या दिवशी गुरुवारी सकाळी महाप्रसादाचे आयोजन कमिटीच्या वतीने करण्यात आले होते. रात्री साडेनऊ वाजता कव्वाली चा शानदार मुकाबला कव्वाल 'शाद अजमेर (अहिल्यानगर) व प्रविण शहजादी (लातूर)' यांच्यात 'चढता सूरज धीरे-धीरे ढलता हि ढल जायेगा...', 'तूने जो कमाया हैं, दुसरा हि खायेगा... खाली हात आया हैं, खाली हात जायेगा...' अशा अनेक कव्वालींवर जल्लोषात रंगला होता. प्रतिवर्षी येथील सैलानी बाबा देवस्थान मध्ये हा कार्यक्रम मोठ्या थाटामाटात साजरा केला जातो. या कार्यक्रमात जिल्ह्यासह परजिल्ह्यातील सर्व जाती-धर्मांचे बांधव सहभागी होत, एकोप्याने बाबा सैलानी चा संदल व उर्स उत्सव मोठ्या आनंदाने साजरा करतात. या कार्यक्रमाचे आयोजन येथील सैलानी बाबा देवस्थान कमिटीने तर कार्यक्रमाला विशेष सहकार्य समस्त ग्रामस्थांनी केले.



## गंगामसल्यात अवैध वाळू वाहतूक करणारा ट्रॅक्टर महसूल पथकाने पकडला

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील गोदावरी व सिंधफाना नदीपात्रातून सध्या बेसुमार अवैध वाळू उत्खनन व वाहतूक मोठ्या प्रमाणावर होत असतांनाच दि ०५ एप्रिल शुक्रवार रोजी गंगामसला गोदावरी नदीतून भरदिवसा अवैध वाळू उत्खनन करुन वाहतूक सुरु असल्याची माहिती महसूल पथकाला मिळाल्याने महसूल पथक गंगामसला येथील गोदावरी नदीत गेले असता त्याठिकाणी अवैध वाळू उत्खनन व वाहतूक करतांना एक ट्रॅक्टर आढळून आल्याने सदर ट्रॅक्टर महसूल पथकाने जप्त केले आहे. हि कारवाई तहसीलदार श्रीमती वर्षा मनाळे यांच्या मार्गदर्शनाखाली गंगामसला मंडळधिकारी ए.डब्लू सानप,, तलाठी आर.एस. आभारे,तलाठी व्ही.एन.नाके, तलाठी धम्मानंद शिंदे,कोतवाल गणेश खेत्री, नारायण खेत्री यांनी केली.

## रमजान ईद पूर्वी निराधार लाभार्थ्यांचे अनुदान खात्यावर वर्ग करा-आ.लक्ष्मण पवार

गेवराई । प्रतिनिधी

**मुस्लिम समाजातील पवित्र रमजान महिन्यांतील रमजान ईद हा सण म्हणजे सर्वात मोठा सण आहे त्यामुळे गोरगरीब निराधार योजनेंतर्गत लोकांना आपल्या हाक्काचे अनुदान म्हणजे आधार आहे तरी रमजान ईद काही दिवसांवर आली आहे तरी जानेवारी, फेब्रुवारी,मार्च महिन्याचे निराधारांचे हाक्काचे अनुदान अजुन भेटले नाही अशी तक्रार लाभार्थी करत होते तरी नागरिकांच्या तक्रारीची दखल घेत आ.लक्ष्मण पवार यांनी तहसील प्रशासनाला सुचना केली होती त्यामुळे मंगळवार दि २ एप्रिल रोजी तहसिलदार यांनी ३०३३४ इतक्या लाभार्थीचे अनुदान बॅकेत पाठवले आहेत तरी रमजान ईद पुर्वी निराधारांचे अनुदान खात्यावर जमा करावेत अशी सुचना आ.लक्ष्मण पवार यानी तहसिल व बॅकेच्या आधिकारी यांना केले असल्यासचे आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.**



गोरगरीब निराधार योजनेंतर्गत लाभार्थीना महाविकास आघाडीच्या काळात १ हजार रूपये प्रमाणे अनुदान देण्यात येत होते पण महाराष्ट्रात महायुतीचे सरकार आले आणी महायुती सरकाने निराधार योजनेतील गोरगरीब लाभार्थीच्या अनुदान एक हाजार वरुन दिड हजार रुपयांपर्यंत केलेले आहे. तर गेवराई तहसिल कार्यालयने निराधार योजनेंतर्गत ३०३४ हाजार लाभार्थी अनुदान बॅकेत पाठवले असून गेवराई तालुक्यातील ३०३३४ हाजार संजयगाधी,श्रावणबाळ योजनेतील लाभार्थीना दिड हाजार प्रमाणे तिन महिन्यांचे प्रती लाभार्थी चार हाजार पाचशे रु. तर इंदिरागाधी योजनेतील लाभार्थीना ३ महिन्यांचे तिन हाजार नउशे रु. प्रमाणे अनुदानाचे बील मंगळवारीच बॅकेत गेले आहे. तरी मुस्लिम समाजातील पवित्र रमजान ईद लक्षात घेता ईद पुर्वी निराधार योजनेतील लाभार्थीचे अनुदान खात्यावर वर्ग करावेत अशा सुचना आ.लक्ष्मण पवार यांनी दिली.

## हीट अँड रन केसचा निपटारा जलद गतीने व्हावा : जिल्हादंडाधिकारी




बीड। पतिनिधी

हिट अँड रन केस मध्ये अपघातग्रस्त झालेल्या व्यक्तीला नुकसान भरपाई देण्याबाबतचा निपटारा जलद व्हावा, असे निर्देश जिल्ह दंडाधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी आज दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात हीट अँड रन सनियंत्रण समितीची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीस अतिरिक्त पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे समन्वयक गजानन सोनी यांच्यासह तालुक्यातील उपविभागीय अधिकारी दूरदृष्टीच्या माध्यमातून उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी यांनी आढावा बैठक घेऊन हीट अँड रन प्रकरणात बळी पडणाऱ्या अपघातग्रस्तांना नुकसान भरपाईची अंमलबजावणी करण्याबाबतचे निर्देश दिले. यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाचे १२ जानेवारी २०२४ चा निर्णय आहे. हा निर्णय सर्वच संबंधित यंत्रणांना लागू असून या निर्णयाची नीट अंमलबजावणी व्हावी, अशा सूचना त्यांनी यावेळी केल्या. झालेल्या बैठकीत बीड उपविभागीय कार्यातून एक अर्ज प्राप्त झालेल्या ची माहिती देण्यात आली असून या अर्जावर कारवाई करण्यात आलेल्या ची माहिती उपविभागीय अधिकारी यांनी दिली. तसेच माजलगाव मधून दोन प्रकरण प्राप्त झाले असून हे प्रकरण अद्याप प्रलंबित असल्याची माहिती देण्यात आली. या समितीचे सदस्य सचिव हे अतिरिक्त पोलीस अधीक्षक असून त्यांनी हीट अँड रन केस मध्ये जखमी झालेल्यांना नुकसान भरपाई मिळाल्याची तपासणी त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व पोलीस ठाण्यांकडून येणाऱ्या अहवालानुसार योग्य रीतीने व जलद गतीने करण्याचे निर्देश जिल्हादंडाधिकऱ्यांनी यावेळी दिल्या.

## पान १वरून...

### मराठवाड्यात दोन कोटी ४३

मदतीने गाळपासाठी ऊस तोडणी अवघड आहे. हे लक्षात घेऊन शिल्लक राहणारा ऊस ७० टक्के मशिनच्या साह्याने व ३० टक्के मजुरांच्या मदतीने संपविण्याचे नियोजन केले असल्याचे साखर विभागाच्या सुत्रांनी सांगितले. अर्थात, नियोजनानुसार मजुरांची उपलब्धता राहण्याची शक्यता कमीच आहे.

------------

### बीडमध्ये भाजपा महायुतीचे जिल्हा प्रचार

सुरू झाले आहे. आता या ठिकाणाहून लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या अनुषंगाने काम केले जाणार आहे. दुपारी पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते फीत कापून या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी भाजप महायुतीच्या कार्यकर्त्यांनी पंकजाताई यांच्या समर्थनार्थ प्रचंड घोषणाबाजी करत त्यांचे मोठ्या जल्लोषात स्वागत केले. पकार्यालयाच्या शुभारंभ प्रसंगी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, शिवसेना जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे, डॉ. योगेश क्षीरसागर, बबनराव गवते, अमर नाईकवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

-----------

### ज्योती मेटे यांचे बीड

जाहीर करण्यात आली. ज्योती मेटे यांना डावलण्यात आले. कोणत्याही परिस्थितीत लोकसभा निवडणूक लढवायचीच, असा निर्णय ज्योती मेटे आणि त्यांच्या समर्थकांनी घेतल्यामुळे शुक्रवारी दुपारनंतर मेटे यांनी संभाजीनगर वरून जबरदस्त शक्ती प्रदर्शन करत बीड जिल्ह्यात आगमन केले. जागोजागी कार्यकर्त्यांनी त्यांचे जंगी स्वागत केले. जेसीबीच्या सहाय्याने त्यांच्यावर फुलांची उधळण करण्यात आली. मेटे यांनी गेवराई सह इतर ठिकाणी भेटीगाठी करत एक प्रकारे धडाक्यात प्रचाराची सुरुवात केली आहे. वंचित बहुजन आघाडीच्या माध्यमातून त्या निवडणूक लढवतील अशी शक्यता वर्तवली जात असून तसेच झाले तर बजरंग सोनवणे आणि पंकजा मुंडे यांच्यासाठी ही धोक्याची घंटा असू शकते.. मेटे यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतल्यावर बीड लोकसभा मतदारसंघात तिहेरी लढत होईल, असे दिसते. तसे झाले तर बीडचा खासदार कोण होणार हे आत्ताच सांगणे धोक्याचे ठरेल.

-------------

### यूपीत मदरशातील शिक्षण

ठरवण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. उत्तर प्रदेश मदरसा कायदा रद्द करण्याच्या अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयात झालेल्या सुनावणीदरम्यान मदरसा बोर्डाच्या वतीने अभिषेक मनू सिंघवी यांनी बाजू मांडली. त्यांनी म्हटले की, हा कायदा रद्द करण्याचा अधिकार उच्च न्यायालयाला नाही. या निर्णयामुळे १७ लाख विद्यार्थ्यांना फटका बसला आहे. तसेच यामुळे सुमारे २५ हजार मदरसे प्रभावित झाले आहेत. हे मदरसे सुमारे १२५ वर्षे जुने आहेत. १९०८ पासून या मदरशांची नोंदणी झाली आहे. उच्च न्यायालयाच्या निकालाला आव्हान देणाऱ्या पाच विशेष याचिकांवर नोटीस जारी करताना सर्वोच्च न्यायालयाने निरीक्षण नोंदवले की, ''आम्ही असे मानतो की याचिकांमध्ये उपस्थित केलेल्या मुद्द्यांवर लक्षपूर्वक विचार करणे योग्य आहे. आम्ही नोटीस जारी करीत आहोत.'' कायद्याच्या तरतुदी समजून घेण्यात उच्च न्यायालयाने प्रथमदर्शनी चूक केली, असे निरीक्षणही सरन्यायाधीश डी. वाय. चंद्रचूड, न्यायमूर्ती जे. बी. पारदीवाला आणि मनोज मिश्रा यांच्या खंडपीठाने नोंदवले. उच्च न्यायालयाच्या निर्देशांमुळे सुमारे १७ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्यातील शिक्षणावर परिणाम होईल, अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाने उच्च न्यायालयाच्या निर्णयाला स्थगिती देताना केली. या प्रकरणी फटकारताना उच्च न्यायालयाने प्रथमदर्शनी या कायद्यातील तरतुदींचा चुकीचा अर्थ लावला. या कायद्यात कोणत्याही धार्मिक सूचनांची तरतूद नाही. कायदा आणि त्याचा हेतू नियामक आहे,'' असे खंडपीठाने आदेशात म्हटले आहे. मदरसातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे याची चिंता असेल तर मदरसा कायदा मोडीत काढणे हा त्यावरील उपाय नसून विद्यार्थी दर्जेदार शिक्षणापासून वंचित राहू नयेत यासाठी योग्य ते निर्देश जारी करणे हा उपाय आहे, असेही न्यायालयाने नमूद केले. उत्तर प्रदेश सरकारतर्फे अतिरिक्त सॉलिसिटर जनरल केएम नटराज यांनी बाजू मांडली. त्यांनी सांगितले की, राज्याने उच्च न्यायालयाचा निकाल स्वीकारला. पण उच्च न्यायालयात बाजू मांडूनही राज्य सरकार त्यांच्या कायद्याबाबत बचावाची भूमिका का घेत नाही, असा सवाल सरन्यायाधीशांनी केला. त्यावर एएसजी म्हणाले की उच्च न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर, राज्याने तो स्वीकारण्याचा निर्णय घेतला.

------------

### भीमा कोरेगाव दंगल प्रकरणात

त्यावर न्यायमूर्तींनी शोमा सेन यांना काही शर्तींवर जामीन मंजूर केला. सेन यांनी विशेष सत्र न्यायालयाची परवानगी घेतल्याशिवाय राज्याबाहेर जाऊ नये, आपला पासपोर्ट तपास अधिकाऱ्यांकडे जमा करावा, निवासी पत्ता, मोबाईल क्रमांक अशी सर्व माहिती देऊन मोबाईलमध्ये जीपीएस लोकेशन सुरु ठेवावे, अशा अटी लादून न्यायालयाने सेन यांना जामीन मंजूर केला. भीमा कोरेगाव येथे १ जानेवारी २०१८ रोजी दंगल घडली होती. या प्रकरणात १६ आरोपींना अटक झाली असून त्यातील सहा जणांना जामीन मंजूर झाला आहे.

-------------

### पहिले पान ठेवून आतील

काँग्रेस घाबरत नसल्याचे त्यांनी ठणकावून सांगितले. सगळेच घाबरायला लागले. तर या देशात गुलाम म्हणून राहावे लागेल. या देशात सगळीकडे विषम वातावरण निर्माण केले जात आहे. मागील पाच वर्षात सरकारने कोणत्याच मुद्यावर काम केले नाही. त्यामुळे श्रीरामाच्या नावाने मत मागण्याची पाळी मोदी सरकारवर आली आहे. काम केले असते, तर हे मुद्दे लोकसभा निवडणुकीत पाहायला मिळाले नसते. देशाची वाईट व्यवस्था आहे. देशातील गरिबी कमी झाली नाही. फक्त कागदावर सांगितल्या जात आहे. काँग्रेसच्या काळामध्ये गरीबांना ३७ किलो धान्य मिळत होते. पाच किलो धान्य आता ८० कोटी जनतेला मिळत आहे. त्यामुळे जनता गरीब झाली की श्रीमंत असा सवाल वडेट्टीवार यांनी केला.

### घर का न घाट का अशी शिंदेंच्या खासदारांची अवस्था

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सोबत गेलेल्या खासदारांची गत काय आहे, ना घर का, न घाट का अशी अस्वस्था त्यांची झाली आहे. यामुळेच भविष्याचा वेध घेता शिंदे गटातील निम्मे आमदार उद्धव ठाकरे यांच्याशी संपर्कात आहेत, असा दावा विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी माध्यमांशी बोलताना केला.

cmyk

# अॅड. सुधीर कराड यांची भारत सरकार नोटरी पदावर निवड



बीड : बीड जिल्हा न्यायालयात गेल्या २० वर्षापासून वकीली व्यवसाय करणारे अॅड. सुधीर कराड यांची भारत सरकार नोटरी या पदासाठी निवड करण्यात आली आहे. सदरची निवड प्रकिया ही ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागवुन करण्यात आलेली आहे. तसेच त्यामध्ये ऑनलाईन मुलाखती घेण्यात आल्या व नंतर सर्व प्रक्रिया पुर्ण होऊन भारत सरकारने दिनांक १४ मार्च २०२४ रोजी त्यांच्या अधिकृत वेबसाईटवर (सांकेतस्थळावर) पात्र उमेदवारांची यादी / निवड यादी प्रकाशित केली. त्यामध्ये अॅड. सुधीर कराड यांची देखील निवड झालेली आहे. सदरील निवडीमुळे त्यांचे हातुन नोटरी, गोरगरीब, शेतकरी, शेतमजुर यांना नोटरी दस्तऐवजाचे काम करणार आहेत. त्यांचे भारत सरकारी नोटरी पदी निवड झाल्यामुळे त्यांचे जवळचे मित्र, नातेवाईक, अप्तेष्ट यांचेकडून कौतुक व अभिनंदन करण्यात येत आहे.

दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

शनिवार, दि. ६ एप्रिल २०२४



# वन्यप्राणी व पशुपक्षांच्या पिण्याच्या पाण्यासाठी वनविभागाने बांधले आठ पाणवठे

## पाणवठ्यांना दररोज टँकरद्वारे होता पाणी पुरवठा







**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

उन्हाचा पारा जस-जसा वाढत आहे. तशी-तशी वन्य प्राणी व पशु पक्षांना पाण्याचा शोध घेण्यासाठी जंगलात भटकंती करावी लागू नये. यासाठी वनविभागाने वन्य प्राणी व पशु-पक्षांच्या पिण्याच्या पाण्यासाठी जगंल परिसरात आठ पाणवठे तयार केले आहेत. या पाणवठ्यांना दररोज टँकरद्वारे पाणी पुरवठा होवू लागला आहे. परिणामी जंगलातील वन्य प्राणी व पशु-पक्षी यांच्या पाण्याचे सोय झाली आहे.

अंबाजोगाई तालुक्यात वनविभागाचे ३ हजार २५० हेक्टर क्षेत्र आहे. यात अंबाजोगाई शहरालगत १३२८ हेक्टर, मांडवा परिसर, ६५० हेक्टर, शेपवाडी २५६ हेक्टर तर अंबलवाडी, साकुड, वरवटी, धर्मापुरी व तळणी या परिसरात ७०० हेक्टर क्षेत्र आहे. या विस्तीर्ण जंगल प्रदेशात

बिबट्या, तडस, हरिण, काळवीट, नीलगाय, रानडुक्कर, साळींदर, ससे, मुंगूस, घोरपड व अनेक सरपटणारे प्राणी व पशु-पक्षी यांची मोठी संख्या आहे. विस्तीर्ण वाढलेली झाडी व सधन होत असलेले जंगल यामुळे वनविभागाचा हा परिसर आकर्षक बनला आहे. या वन विभागात असणार्या वन्य प्राणी व पशु-पक्षांना उन्हाळ्याची झळ बसू नये. त्यांना पाणी टंचाईचा सामना करण्याची वेळ येवू नये यासाठी अंबाजोगाईच्या वनविभागाने जंगल परिसरात आठ पाणवठे निर्माण केले आहेत. या पाणवठ्यांना दररोज टँकरद्वारे पाणी पुरवठा होतो. या शिवाय अंबाजोगाई परिसरातून बारा माहि वाहणार्या वाना नदीच्या पात्रातही सातत्याने पाणी राहत असल्याने प्राण्यांना पाण्याचा त्रास होत नाही. या शिवाय तळणी, धर्मापुरी, अंबलवाडी या परिसरात असणारे तलाव यामुळेही पाण्याची गैरसोय दुर होते. तसेच या नविन झालेल्या आठ पानवठ्यांमुळे प्राण्यांना वनवन भटकंती करण्याची वेळ येणार नाही. अशी सुविधा वनविभागाने उपलब्ध करून दिली.

# श्री मंगलनाथ संस्थेचे यशस्वी २५ व्या वर्षात पदार्पण

## मार्च २०२४ अखेर १३ कोटी ८३ लाख नफा मिळवत घवघवीत यश

माजलगाव । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातिल सहकार बँकिंग क्षेत्राचा पाया मानल्या जाणाऱ्या श्री मंगलनाथ संस्थने २५ व्या रोप्यमोहोत्सव वर्षात यशस्वी पदार्पण केले आहे. संस्थेने कार्यक्षेत्रातील सभासद,हितचिंतक,नागरिक यांच्या विश्वासास सदैव पात्र राहुन मार्च २०२४ अखेर घवघवीत यश संपादन करून १३ कोटी ८३ लाख रुपये नफ्यासह ६०२.०८ कोटी व्यवसायाचा टप्पा यशस्वी पूर्ण केला आहे.

संस्थेने गेली २४ वर्षात सभासदांच्या अपेक्षा जाणून कार्य केले आहे त्यामुळे सभासदांचा बहुमूल्य प्रतिसाद प्राप्त करून गेली २४ वर्ष संस्था अविरत अखंड कार्य करत आहे.संस्थेने ग्रामीण भागापासून ते शहरी भागात शाखांचा विस्तार केलेला असून सर्व शाखा या नफ्यात आहेत.मराठवाड्यातील सर्वात जास्त सोने तारण कर्ज वाटप करणारी एकमेव संस्था म्हणून संस्थेचे नाव यापूर्वीच लौकिक आहे संस्थेची प्रतिमा कायम ठेवून संस्थेने आखलेल्या १००० कोटी व्यवसाय



पूर्ततेच्या अनुषंगाने काम करत येणाऱ्या काळात अल्प व्याजदरात जास्तीजास्त सोनेतारण कर्ज वाटप करून सभासदांच्या ठेवीना अधिकाधिक सुरक्षा देण्याचा मूळ उद्दिष्ट संस्थेचे आहे.संस्थेच्या या घवघवित यशाबद्दल संस्थेचे सभासद,हितचिंतक,मित्र परिवार यांच्या सहकार्याबद्दल संस्थेचे मुख्यकार्यकारी अधिकारी ऍड रवींद्र कानडे यांनी आभार व्यक्त केले.

संस्थेचे अध्यक्ष मा.आर.जी.कानडे यांनी या यशाबद्दल बोलताना सांगितले कि, संस्थेने व्यवसाय वाढीसह संस्थेच्या सभासदांच्या ठेवीना सुरक्षा निर्मितीकरीता नेहमीच प्राधान्य दिले आहे. संस्थेचे मार्च २०२४ अखेर एकूण २३३. १३ कोटी कर्ज वाटप आहे त्यामध्ये सुरक्षित सोनेतारण कर्ज ,वेअरहाऊस कर्ज,मुदत ठेव कर्ज वाटप असून एकूण कर्जवाटपाच्या ९२.२४ टक्के कर्ज हे सुरक्षित आहे त्यामुळे निश्चितच सुरक्षित कर्ज वाटपाच्या माध्यमातून सभासदांच्या ठेवीना सुरक्षा कवच निर्माण केले आहे. तसेच संस्थेने कर्ज वसुलीत देखील यश मिळवून एन.पी.ए ६.९९ व नेट एन.पी ए. २.३२ टक्के आहे संस्थेची एकूण गुंतवणूक १२८ कोटी आहे. तर संस्थेचा स्वनिधी ५८ कोटी आहे. या आर्थिक वर्षात संस्थेद्वारे १६२१ कोटी पेक्षा अधिक उलाढाल करून ग्रामीण भागातील अर्थकारणाला चालना देण्याचे काम संस्थेने केले आहे.पारदर्शक व सुरक्षित व्यवहार करून सभासदांचा विश्वास संपादन करून संस्थेने सभासदांच्या ठेवीच्या सुरक्षिततेला प्राधान्याचा देत कार्य केले म्हणून सभासदांचा संस्थेवरील सदैव असणाऱ्या विश्वासास पात्र राहून २५ व्या वर्षात संस्था दमदार पदार्पण करत आहे. संस्थेच्या या घवघवित यशाबद्दल संस्थेचे सभासद,हितचिंतक,मित्र परिवार यांच्या सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

# पिंपळवंडी येथे इफ्तार पार्टी संपन्न

पिंपळवंडी । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे पवित्र रमजान महिना निमित्त मुस्लिम बांधवांना दि.३ एप्रिल बुधवार रोजी बंडू आण्णा पवार व अजित पवार दि.४ एप्रिल गुरुवार रोजी भाऊसाहेब पवार (रानमळा) तर दि.५ एप्रिल शुक्रवार रोजी सरपंच निलेश मोरे यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मोठ्या संख्येने मुस्लिम-हिंदू बांधवांनी उपस्थिती दर्शविली व इफ्तार पार्टीच्या माध्यमातून मुस्लिम-हिंदू एकतेचा संदेश देण्यात आला.या कार्यक्रमाला चेअरमन शिवाजी पवार, उपसरपंच दादासाहेब पवार,अशोक गुजर,अजित पवार, राजू मोरे,सुरेश पवार,दादासाहेब पवार,विनोद पवार,विलास पवार, शेखर



पवार,सुनील पवार,गोकुळ राऊत,संतोष पवार,अनिल पवार, बिबिशन पवार,आश्रूबा जरे,पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार,रुपेश जरे, शेख बाबासाहेब,शेख युसुफ सर,लियाकत राज,शेख चांद भाऊसाहेब,शेख बशीर, अमजद शेख,अकील शेख,फकीर गयास,शाबुद्दिन सय्यद,सलीम सय्यद,शाहरुख शेख आदीसह हिंदू-मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अध्यक्षपदी प्रा.डॉ.अनिलकुमार साळवे तर स्वागताध्यक्षपदी जगदीश पोपळे

**माजलगाव । प्रतिनिधी**

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने दिनांक २३ एप्रिल रोजी फुले पिंपळगाव शिवारामध्ये पंधराव्या शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत असून या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी प्रसिद्ध नाटककार व चित्रपट दिग्दर्शक प्रा.डॉ.अनिलकुमार साळवे यांची तर स्वागत अध्यक्षपदी पत्रकार जगदीश पोपळे यांची निवड करण्यात आली आहे.

मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगाव च्या वतीने मागील १४ वर्षापासून सातत्याने व नियमितपणे शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे.साहित्य क्षेत्रामध्ये अत्यंत सक्रिय असलेल्या माजलगाव मसाप वतीने दिनांक २३ एप्रिल रोजी १५ व्या शिवार साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येत आहे.माजलगाव तालुक्यातील फुले पिंपळगाव शिवारामध्ये होणाऱ्या या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी, निवड झालेले प्रा.डॉ.अनिलकुमार साळवे हे माजलगाव चे भूमिपुत्र असून त्यांनी नाट्य तसेच चित्रपट





दिग्दर्शनाच्या क्षेत्रामध्ये मोठे नाव लौकिक मिळवलेले आहे.त्यांनी आजवर शापित,गांधीजींचा चष्मा हरवला,राज्यकर्ता,ग्लोबल आडगाव,अघटीत,शांतता दंगल चालू आहे,रणसंग्राम,आक्रोश अशा ४१ एकांकिकांचे लेखन केले आहे. नावाजलेल्या व अभिनेता सयाजी शिंदे,उषा नाडकर्णी,उपेंद्र लिमये,अनिल नगरकर यांची प्रमुख भूमिका असलेल्या ग्लोबल आडगाव या नामांकित चित्रपटाचे लेखन ही त्यांनी केले आहे.या चित्रपटाला अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या युवक महोत्सवामध्ये ५ वेळा सांघिक, ९ वेळा नाट्यगटाचे पुरस्कार १ वेळ राष्ट्रीय नाट्यगटाचे पारितोषिक ही त्यांनी प्राप्त केलेली आहेत. उध्वस्त,अग्निकुंड,ओयासिस, कथा खैरलांजी,वतन के लिए अशा नाट्य लेखनाबद्दल त्यांना अनेक पुरस्कार मिळाले आहेत. तसेच अनेक विनोदी लघुनाट्य पथनाट्य आजवर त्यांनी लिहिली आहेत. लघु चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन करताना शिरमी (१८ राष्ट्रीय पुरस्कार), १५ ऑगस्ट (४० राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पुरस्कार), डोंब (४ राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पुरस्कार) कोंदण (राष्ट्रीय फिल्म फेस्टिवल मध्ये निवड) अशा प्रतिभा संपन्न लेखन, ही त्यांनी केले आहे.

शिवर साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी पत्रकार जगदीश पोपळे यांची निवड करण्यात आली आहे. आपल्या दैनंदिन पत्रकारितेतून अनेक सामाजिक प्रश्न त्यांनी लिखाणाद्वारे मांडले व सोडवलेले असून कल्पक शेतीचा पुरस्कार करणारे शेतकरी म्हणूनही त्यांची ओळख आहे. विविध प्रकारच्या व जातींच्या जवळपास ४० फळझाडांची लावण त्यांनी शेतात केलेली असून सिताफळाचे मोठे उत्पादन ते घेत असतात. मराठवाडा साहित्य परिषद शाखा माजलगावच्या दिनांक ४ रोजी झालेल्या कार्यकारणीच्या बैठकीत वरील निवड करताना

म.सा.प. शाखेचे अध्यक्ष मुकुंदराज सोळंके,प्रा.स्नेहलताई पाठक (उपाध्यक्ष), प्रा.डॉ.भाऊसाहेब राठोड (कार्यवाह), बालासाहेब झोडगे (सहकार्यवाह), प्रा.डॉ.उमेश साडेगावकर( सहकार्यवाह) यांची उपस्थिती होती.

# संतांचे ग्रंथच मनुष्याच्या जीवन कल्याणाचे साधन आहेत - ह.भ.प. चैतन्य महाराज

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संतत्व सिद्ध करून झालेले अनंत संत मांदियाळीत आहेत. संत तेथे देव ही परिपूर्णता आहे ती साधल्यासच आचार विचार आणि संस्कार आत्मसात होतात व त्यांचे ग्रंथ हे मनुष्याच्या कल्याणाचे साधन आहेत असे मत संत साहित्याचे अभ्यासक, प्रवचनकार, किर्तनकार ह.भ.प. चैतन्य महाराज देगलूरकर यांनी व्यक्त केले.

ते अंबाजोगाईत माळीनगर भागातील संत सावतामाळी मंदीरात श्री.विठ्ठल रुक्मिणी,संत सावता महाराज प्राण प्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्या निमित्ताने हरीभक्तीपर सुश्राव्य किर्तनात शुक्रवारी उपदेशपर बोलत होते.पुढे ते म्हणाले की, आपल्या जीवनात ईश्वराचे ,संताचे अधिष्ठान हवे संतांच्या सानिध्यात राहिल्यास जीवन सार्थकी लागते आशिर्वाद प्राप्त झाल्यास यश संपादन करता येते.

संत सावतामाळी यांची देवाप्रति दृढ





भक्ती होती त्यांचे भजन म्हणजे भक्तीचा मळा होते. जीवन कर्मामध्ये प्रवृत्त होण्यासाठी संत सावता माळी यांनी ईश्वरीय अनुभवाचे चिंतन करून सिध्दी प्राप्त करून घेतली.अशा प्रकारच्या विविध संतांनी निर्माण केलेले ग्रंथ हे मनुष्याच्या जीवन कल्याणाचे साधन असल्याचे सांगून वारकरी सांप्रदाय हा भक्ती आणि परंपरेचा वारसा तर आहेच पण भक्ताला बळही देणारी सात्विकता त्यात असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी सकाळच्या सत्रात ह.भ.प.चैतन्य महाराज देगलुरकर यांच्या हस्ते व सुभाष कुलकर्णी,उदय कुलकर्णी,अमोल घोडके,विनोद निकम आदीसह इतर मान्यवरांच्या उपस्थितीत प्राणप्रतिष्ठापना सोहळा संपन्न झाला. या सर्व कार्यक्रमास अनेक महिला,पुरुष भक्त भाविक शहरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या धार्मिक कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संत सावता महाराज भजनी मंडळ,संगम गणेश मंडळ यासह अनेकजण परीश्रम घेत आहेत.

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी पतसंस्थेस मार्च २०२४ अखेरिस ५.३६ लाखांचा निव्वळ नफा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई पंचक्रोशीतील महिलांचे आर्थिक उदात्तीकरण करून त्यांना समाजात मानाचे स्थान मिळवून देण्यासाठी साधारणतः सात वर्षापूर्वी सुरू केलेल्या क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेस ३१ मार्च २०२४ अखेर ५.३८ लाखांचा नफा झाल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ . सुनीता राजकिशोर मोदी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे .आपला भारत देश हा पुरुष प्रधान संस्कृतीचा देश आहे .देशात महिलांना दुय्यम स्थान देण्यात आले आहे. त्यामुळे महिला नेहमी घर, चूल आणि मूल यामध्येच गुरफटून पडल्याचे दिसून येते.यातून महिलांना बाहेर काढून त्यांना आर्थिक स्वायत्तता उपलब्ध करून देण्यासाठी या पतसंस्थेची निर्मिती करण्याचे ठरले.त्याचप्रमाणे महिलांचा आर्थिक स्तर उंचावून त्याचा फायदा कुटुंबाला व्हायला हवा याच पवित्र हेतूने केवळ महिलांसाठीच संस्थापक राजकिशोर मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले महिला नागरी सहकारी पतसंस्थेची निर्मिती करण्यात आल्याची माहिती पतसंस्थेच्या अध्यक्षा सुनीता राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे देण्यात आली.

पतसंस्थेस उपाध्यक्षा डॉ.राजश्री राहुल धाकडे, संचालिका धर्मपात्रे रुपाली सुधीर , खडकभावी शोभा बाबू , सरवदे संगीता विष्णू , मसने उषा गणेश, मस्के अंजली विष्णुपंत , रापतवार सविता विजय , खंडाळे सुरेखा बाबुराव , फारोखी परवीन नुजहत, चोकडा जमुना जयप्रकाश आणी मोहिते सायली सुहास यांचे सहकार्य लाभत आहे .

३१ मार्च २०२४ अखेर पतसंस्थेच्या सभासदांची संख्या ही ३४७४ एवढी असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. त्याचबरोबर संस्थेचे भागभांडवल हे रुपये २७ लाख एवढे जमा असून संस्थेचा स्वनिधी हा रुपये ४० लाख एवढा आहे.वर्षाखेरीस पतसंस्थेच्या एकूण ठेवी या रुपये ४ कोटी ३३ लाख असल्याचे सांगून मार्च २०२४ अखेर पतसंस्थेने समाजातील महिलांना ३ कोटी २६ लाख रुपयांचे अर्थसहाय्य करून त्यांचा पर्यायाने त्यांच्या कुटुंबाचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी प्रयत्न केला आहे. सावित्रीमाई फुले महिला पतसंस्थेची अंबाजोगाई पिपल्स को ऑप बँकेत ०२ कोटी रुपयांची गुंतवणूक देखील केली आहे.तसेच पतसंस्थेचा स्वनिधी हा रुपये ४० लाख एवढा जमा असल्याची माहिती अध्यक्षा सौ सुनीता राजकिशोर मोदी यांनी प्रसिद्धी पत्रकात दिली आहे.

# पूर्वीच्या काळी सायकल रिक्षाचालकांचा असायचा थाट,मात्र आधुनिक काळात केवळ फरफटच

**ज्योतिराम पाढरपोटे । माजलगाव**

काय थाट होता त्यांचा एकेकाळी.छुन्नुक छुन्नुक आवाज आला की पूर्ण गल्लीला कळायचे, सायकलरिक्षा आली. त्यात कधी कुणी आपली व्यक्ती असायची,कधी शाळेतली मुले.त्या रिक्षावाल्यालाही भारी मान होता. भाड्यापेक्षा दोन पैसे जास्तच पडायचे त्याच्या हातात.मात्र, आज परिस्थिती बदलली,इतर पर्यायी साधने,यामुळे बरेचसे सायकलरिक्षा थांबले. जे आहेत,ते फक्त मालवाहू बनले.

दोन दशकांपासून माजलगाव नवीन बसस्थानक,जुने बसस्थानक,जुना मोंढा,झेंडा चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात सायकलरिक्षा चालविणारे पूर्वी शहरात नोकरीसाठी, व्यवसायासाठी येणाऱ्या व्यापाऱ्यांकडून सायकलरिक्षालाच पसंती दिली जात होती.मात्र, जेव्हापासून ई-रिक्षा आले तेव्हापासून फक्त दारोदारी जाऊन वस्तू विकणारे किंवा जास्त सामान असलेल्या फेरीवाल्यांपलीकडे सामान्य नागरिक प्रवास करत नाहीत.'शहरापासून जवळच असलेल्या पुर्नवसन परिसरात राहणारे ओंकार रत्नपारखी म्हणतात, 'लहानपणी शाळेत जाण्यासाठी वडिलांनी सायकलरिक्षा लावून दिली होती.दररोज ते रिक्षावाले काका शाळेत घेऊन जायचे आणि परत घरी सोडूनही द्यायचे.









**वेळ,खर्च वाचवण्यासाठी ई-सायकल,पेट्रोल, डिझेल रिक्षांना नागरीकांची पसंती**

मुलांनी भरगच्च भरलेल्या रिक्षाचा तो प्रवास लहानपणी गंमत वाटायचा. रिक्षावाल्या काकांना आम्ही खूप त्रास द्यायचो.कधी रिक्षामधून उडी मारणे तर कधी मागे बसल्या बसल्या सहकाऱ्यांचे दप्तर फेकणे हे रोजचेच होते.मात्र, आज जेव्हा रस्त्याने क्वचितच दिसणाऱ्या सायकल रिक्षाचालकाला बघितले की,मन खूप हळवे होते. पायडल मारताना त्या रिक्षाचालकाचा संघर्ष बघून तर त्याला पैसे देऊन पायी घरी जावे अशी इच्छा होते. आज तर त्यांच्या व्यवसायावरच जणू गदा आली आहे.'

### ज्याचे कोणी नाही, त्याचे आम्ही!

गावखेड्यातून खाद्यपदार्थ,साहित्य विकण्यासाठी येणाऱ्या गोरगरिबांसाठी जास्त साहित्य असल्यामुळे सवारी ऑटो त्यांना बसू देत नव्हते. तर वैयक्तिक ऑटो घेऊन जाणे या विक्रेत्यांना परवडत नव्हते. म्हणून त्यांच्यासाठी फक्त आम्हीच होतो, असे सायकल रिक्षाचालक अभिमानाने सांगतात.

### खांदे दुखतात हो, पण...

रिक्षामध्ये प्रवासी बसले की चढावरून पायडल मारताना कठीण व्हायचे.मात्र, आता प्रवासी मिळत नसल्याने आम्हाला मालवाहतूक करावी लागते.प्रवाशांचे वजन चढावरही तोलणे कठीण होते,मात्र अशक्य नव्हते.आता तर मालवाहतूक कितीतरी भारी असते. पर्याय नसल्याने मिळेल ते भाडे घेऊन हे काम करावे लागते. सायंकाळी खांदे दुखतात.मात्र, पोटासाठी आणि कुटुंबासाठी एवढे सोसावे लागतेच, अशी व्यथा सायकल रिक्षाचालक व्यक्त करतात

cmyk

# ६ वर्षात लाळ्या खुरकूत रोग समूळ नष्ट करणार

## पंतप्रधान नरेंद्र मोदींचा संकल्प!



पाटणा : जनावरांच्या लाळ्या खुरकूत रोगाबद्दल डेअरी उत्पादक शेतकऱ्यांसह सर्वच शेतकरी चांगलेच परिचित आहे. या जीवघेण्या रोगाबाबत आता खुद्द देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मोठे विधान केले आहे. दूध उत्पादक शेतकरी आणि सर्वच शेतकऱ्यांना नुकसानदायी ठरणार हा रोग, पुढील ६ वर्षांत अर्थात २०३० पर्यंत समूळ नष्ट केला जाईल. या रोगावरील लसीकरण प्रक्रिया देशभरात वेगाने राबवली जात असून, त्यावर नियंत्रण मिळवण्यात लवकरच यश मिळेल. असे त्यांनी म्हटले आहे. बिहारच्या जमुई जिल्ह्यात आयोजित जाहीर सभेत त्यांनी याबाबत माहिती दिली आहे.

मानव सेवेप्रमाणेच देशातील पशुधनाचे संरक्षण हे देशातील भाजप सरकारचे प्राथमिक कर्तव्य आहे. ज्यामुळे सरकारने जनावरांचे आजार समूळ नष्ट करण्याचा संकल्प केला असून, देशभरात मोफत लसीकरण राबवले जात आहे. देशभरात जवळपास १५,००० हजार कोटी रुपये खर्चून लाळ्या खुरकूत रोगाचे उच्चाटन करण्याचे प्रयत्न सरकारकडून सुरु आहेत. त्यात पुढील सहा वर्षांमध्ये अर्थात २०३० पर्यंत पूर्णपणे यश मिळण्याची शक्यता आहे. असेही त्यांनी म्हटले आहे.

२४ कोटी जनावरांना लसीकरण : केंद्र सरकारच्या पशुपालन आणि दुग्धविकास विभागाच्या आकडेवारीनुसार, देशभरात लाळ्या खुरकूत रोगावरील लसीकरण अभियान वेगाने सुरु आहे. या अभियानाच्या दुसऱ्या टप्प्यात मार्च २०२४ पर्यंत आतापर्यंत देशभरातील २४ कोटी गाय, म्हैस अशा जनावरांना या रोगाचे लसीकरण करण्यात आले आहे. अर्थात दुसऱ्या टप्प्यातील आतापर्यंत ९५ टक्के लक्ष्य पूर्ण करण्यात केंद्राला यश मिळाले आहे. अशातच आता देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जमुई जिल्ह्यात सभेला संबोधित करताना पशुधनाची रक्षा करण्याचा संकल्प केला आहे.

काय आहे लाळ्या खुरकूत रोग?

लाळ्या खुरकूत रोग हा जनावरांना होणारा जीवघेणा रोग आहे. या रोगामुळे जनावरांच्या तोंडाची कातडी निघते. ज्यामुळे जनावर चारा खाणे कमी करते. शिवाय पाणी देखील कमी पिते. तर पायांच्या खुरांना देखील या रोगामुळे संक्रमण झालेले असते. परिणामी, अशा जनावराची दूध देण्याची क्षमता खूपच मंदावते. ज्यामुळे शेतकऱ्यांना मोठा आर्थिक फटका सहन करावा लागतो.

# भेंडीची लागवड करण्यासाठी वापरा फायदेशीर जाती



उत्पन्न वाढवण्यासाठी शेतकरी हंगामानुसार त्यांच्या शेतात भाजीपाल्याची शेती करतात. भेंडीच्या ज्या सुधारित जातींबद्दल आपण बोलत आहोत त्या पुसा सावनी, परभणी क्रांती, अर्का अनामिका, पंजाब पद्मिनी आणि अर्का अभय या जाती आहेत. या सर्व जाती कमी वेळात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहेत. या जातींची मागणी वर्षभर बाजारात असते. भेंडीच्या या जातींची लागवड देशातील अनेक राज्यांमध्ये केली जाते. भेंडीच्या ५ सुधारित जातींमध्ये जीवनसत्त्वे, फायबर, अँटिऑक्सिडंट्स आणि खनिजे तसेच कॅल्शियम, पोटॅशियम, मॅग्नेशियम, फॉस्फरस आणि लोह मुबलक प्रमाणात असते. यामुळे या भेंडीच्या जातींबद्दल आज आम्ही तुम्हाला माहिती देणार आहोत.

१) पुसा सावनी - भेंडीची ही सुधारित जात उन्हाळा, थंडी आणि पावसाळ्यात सहज पिकवता येते. पुसा सावनी जातीची भेंडी पावसाळ्यात सुमारे ६० ते ६५ दिवसांत तयार होते. २) परभणी क्रांती - भेंडीची ही जात पिटा रोगास प्रतिरोधक मानली जाते. जर शेतकऱ्यांनी बियाणे शेतीत लावले तर त्यांना सुमारे ५० दिवसांत फळे येऊ लागतात. परभणी क्रांती जातीचा रंग गडद हिरवा असतो आणि तिची लांबी १५-१८ सेमी असते. ३) अर्का अनामिका वाण- ही जात यलो मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. या जातीच्या भेंडीमध्ये केस आढळत नाहीत आणि त्याची फळे अतिशय मऊ असतात. ही जात उन्हाळा आणि पावसाळ्यात चांगले उत्पादन देण्यास सक्षम आहे. ४) पंजाब पद्मिनी भेंडीची ही जात पंजाब विद्यापीठाने विकसित केली आहे. या प्रकारची भेंडी सरळ आणि गुळगुळीत असते. त्याच वेळी जर आपण त्याच्या रंगाबद्दल बोललो तर ही भेंडी गडद रंगाची आहे. ५) अर्का अभय - ही जात पिवळ्या मोझॅक विषाणू रोगाशी लढण्यास सक्षम आहे. अर्का अभय जातीची भेंडी शेतात लागवड केल्यावर काही दिवसात चांगले उत्पादन देते. या जातीची भेंडीची झाडे १२०-१५० सेमी उंच आणि सरळ असतात.

# ६५ दिवसांत येणार बटाटा पीक : जाणून घ्या विकसीत केलेली नवी जात



अनेक भारतीयांच्या घरांमध्ये बनवल्या जाणाऱ्या बहुतेक भाज्यांमध्ये बटाटाच्या प्रामुख्याने समावेश असतो. देशात त्याची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते. ज्यामध्ये उत्तर प्रदेशची भूमिका महत्त्वाची आहे. कारण उत्तर प्रदेशमधील लाखो शेतकरी त्याची लागवड करतात. भारतातील एक प्रमुख बटाटा उत्पादक राज्य म्हणून उत्तर प्रदेशची ओळख आहे. इतकंच नाही तर उत्तर प्रदेशात बटाट्याच्या काही खास जातीही उगवल्या जातात. ज्या अल्पावधीत चांगले उत्पादन देतात. त्यामुळे बटाटा उत्पादनात उत्तर प्रदेश देशात अग्रस्थानी आहे. बटाट्याच्या ७० पेक्षा जास्त जाती असल्या तरी कुफरी बहार हा त्यातील सर्वोत्तम प्रकार मानला जातो. देशभरातील लाखो शेतकरी याच्या लागवडीतून चांगला नफा कमावत असतात. त्याचबरोबर बटाट्याची वाढती मागणी पाहता त्याचा वापरही लक्षणीय वाढला आहे.

शास्त्रज्ञांकडून नवीन बटाटा वाण निर्मिती :

बटाट्याच्या ७० पेक्षा जास्त जाती असल्या तरी कुफरी बहार हा त्यातील सर्वोत्तम प्रकार मानला जातो. देशभरातील लाखो शेतकरी याच्या लागवडीतून चांगला नफा कमावत असतात. त्याचबरोबर बटाट्याची वाढती मागणी पाहता त्याचा वापरही लक्षणीय वाढला आहे. उत्तर प्रदेशातील बटाट्यांबद्दल बोलायचे झाले तर चिप्स बनवणाऱ्या कंपन्यांमध्ये ते खूप लोकप्रिय आहे. देशातील अनेक कंपन्या उत्तर प्रदेशातूनच बटाटे खरेदी करतात.

तीन महिन्यांत बटाटा उत्पादन : बटाट्याची दिवसेंदिवस वाढणारी मागणी पाहता नुकत्याच आग्रा येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय खरेदीदार विक्रेता मेळाव्यात बटाट्याच्या नवीन प्रकारावर चर्चा झाली. या जातीचे बटाटे सामान्य बटाट्यांपेक्षा जास्त दराने विकले जातात. बटाट्याची ही नवीन जात नुकतीच विकसित करण्यात आली असून बटाटा टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट शामगडने विकसित केली असून या जातीचे उत्पादन अवघ्या तीन महिन्यांत येईल.

जमीन आणि मातीची गरज भासणार नाही : बटाट्याच्या या नवीन जातीवर कृषी शास्त्रज्ञ सातत्याने काम करत आहेत. बटाटा टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट, शामगड यांनी ही जात तयार केली आहे. या जातीमध्ये भरपूर पौष्टिकता आहे आणि चांगली उत्पादन क्षमता आहे. ही जात अवघ्या ६० ते ६५ दिवसांत तयार होते. हा कालावधी आणखी कमी करण्याचा शास्त्रज्ञांचा प्रयत्न आहे. एरोप्लॅनिक तंत्राचा वापर करून त्याची लागवड करता येते. हे सध्या बाजारात नाही, जरी ते लवकरच बाजारात आणले जाऊ शकते. यावर शास्त्रज्ञ सातत्याने चाचण्या करत आहेत. ही जात विशेषत: उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान आणि पंजाबमधील शेतकऱ्यांसाठी विकसित करण्यात आली आहे.

# दुधाला फॅट कमी लागण्याची कारणे



दुग्ध उत्पादन व्यवसायात दुधाला फॅट (स्निग्धांश), डिग्री (एस.एन.एफ) कमी लागल्यामुळे बरेच नुकसान होते, शासकीय नियमानुसार गाईच्या दुधास ३.५ व म्हशीच्या दुधास किमान ६ टक्के फॅट असणे आवश्यक आहे. यापेक्षा फॅटचे प्रमाण जास्त असल्यास वाढीव दर मिळतो, यापेक्षा कमी असल्यास दूध स्वीकारले जात नाही व असे दूध कमी दराने विकण्याशिवाय पर्या नसतो. परिणाम व्यवसाय तोट्यात जातो हीच परिस्थिती दुधास आवश्यकतेपेक्षा कमी डिग्री लागल्यास दुधाची अस्वीकृती होते. शासनाच्या कडक धोरणामुळे उत्पादकापुढे मोठे संकट उभे राहते व यावर मात करण्यासाठी विविध अनैसर्गिक मार्गांचा अवलंब अविचाराने सुरू होतो. परंतु याने फायद्याच्याऐवजी तोटाच होतो.

बहुतेक वेळा फॅट योग्य प्रमाणात असल्यास डिग्री देखील योग्य प्रमाणात असते, तसेच म्हशीच्या दुधास फॅट किंवा डिग्री कमी लागण्याचे प्रमाण खूप कमी असते. परंतु संकरित गाईत खूप जास्त असते म्हणून संकरित गाई पाळणाऱ्या उत्पादकांनी जास्त दक्षता घेणे गरजेचे आहे. दुधातील इतर घटकांपेक्षा फॅट या घटकात नेहमी चढउतार मोठ्या प्रमाणात होतात, म्हणून या संकटावर यशस्वी मात करावयाची असल्यास दूध उत्पादकांनी यास कारणीभूत असलेल्या शास्त्रीय कारणांचा अभ्यास करणे गरजेचे आहे व त्यावर उपाय करून प्रश्न सोडविले पाहिजेत.

१) आनुवंशिकता - दुधास फॅट कमी लागण्याचे महत्त्वाचे पायाभूत कारण दुभत्या जनावराची आनुवंशिकता असून, दूध उत्पादन क्षमता आणि फॅटचे प्रमाण हे गुणधर्म गुणसूत्राद्वारे नियमित केले जातात. जनावराच्या वंशानुसार त्याच्या दुधातील फॅटचे प्रमाण बदलते. ज्या जातीपासून जास्त दूध उत्पादन मिळते त्या दुधात फॅटचे प्रमाण कमी आढळते व कमी दूध उत्पादन देणाऱ्या जातीमध्ये फॅटचे प्रमाण जास्त असते.

२) दुभत्या जनावराचा आहार- आनुवंशिकता चांगली असूनही त्याच्या क्षमतेनुसार चांगले दूध आणि फॅट मिळविण्यासाठी त्यांना समतोल आहार देणे गरजेचे आहे. बरेच पशुपालक आपल्याकडे उपलब्ध असलेला जो चारा असेल तो जनावरास खाऊ घालतात; परंतु दैनंदिन आहारात फक्त हिरवा चारा दिल्यास जनावरापासून दूध जास्त निघते परंतु फॅटचे प्रमाण कमी मिळते म्हणून पावसाळ्यात दुधाळ जनावरांना बहुतांशी ओला चारा जास्त मिळत असल्यामुळे दुधातील फॅट कमी होते. त्यासाठी त्याच्या दैनंदिन आहारात वाळलेला चारा कमीत कमी ३ ते ४ किलो देणे आवश्यक आहे. तसे पाहता चाऱ्याचे नियोजन करून जनावरांना वर्षभर हिरवा व सुका चारा खाऊ घालावा व सोबत ढेप, चुनी, सरकी, मका अशा प्रकारची प्रथिने व मेदयुक्त आहार द्यावा. दुधातील फॅटचे प्रमाण वाढविण्यासाठी ॲसिटिक आम्ल हा महत्त्वाचा घटक आहे आणि हे आम्ल तयार होण्यासाठी वाळलेल्या (सुक्या) चाऱ्यातील सेल्युलोज (तंतूमय पदार्थ महत्त्वाचे आहे. त्यासाठी गाई, म्हशींना दुधातील जनावरांना हिरव्या चाऱ्यासोबत सुका चारा देणे गरजेचे आहे. ३) दूध काढण्याच्या वेळा - वेळेतील अंतर सर्वसाधारण पशुपालक सकाळी व सायंकाळी अशा दोन वेळेस गाई, म्हशीचे दूध काढतात. या दोन्ही दूध काढण्याच्या वेळेचा दूध उत्पादन व फॅटशी खूप जवळचा संबंध असतो. हे अंतर वाढल्यास दुधाचे प्रमाण वाढू शकेल; पण दुधातील फॅटचे प्रमाण कमी होते.

४) दूध काढण्याच्या चुकीच्या पद्धती - दुधाची धार काढण्यापूर्वी कास चांगली स्वच्छ घुसळून धुवावी, जेणेकरून कासेच्या वरील भागातील दुधातील फॅटचे कण घुसळले जातील व दुधात उतरले जातील. कारण दूधनिर्मिती कासेत सतत कार्यान्वित असते व फॅट हा घटक हलका असल्याने कासेच्या वरच्या भागातील दुधात जास्त प्रमाणात असतो. दूध काढताना सुरुवातीच्या धारांमध्ये सर्वसाधारणपणे एक टक्के इतके फॅट असते तर शेवटच्या धारांपर्यंत संपूर्ण दूध काढावे कारण अपूर्ण दूध काढल्यास दूध निर्मिती प्रक्रियेवर विपरीत परिणाम होऊन दुधातील घटकांचे प्रमाण कमी होते म्हणून दूध पूर्णपणे ६ ते ७ मिनिटाच्या कालावधीत काढणे गरजेचे आहे. पूर्ण दूध काढलेतर दुधातील फॅटवर परिणाम होत नाही. पूर्ण धार नाही काढली तर कासेत दूध राहते व फॅट कमी होते.

५) वासरु कासेला पाजणे - वासराला धारा काढल्यानंतर शेवटचे दूध पिण्यासाठी सोडू नये. शक्यतो वरच्या दुधावर वासरे वाढवावीत. शक्य असल्यास दूध काढणाऱ्या व्यक्तीमध्ये बदल करू नये. बदलामुळे दूध उत्पादनावर परिणाम होतो. सुरुवातीला पान्हा सोडण्यासाठी वासरू सोडणे ठीक आहे. कारण यावेळी दुधात फॅट कमी असते, तसेच शेवटचे दूध शिल्लक ठेवून वासरास सोडतात. म्हणून शेवटच्या दुधात जास्त फॅट असलेल्याचा फायदा मिळत नाही; तो फायदा वासरास मिळतो. ६) जनावराचे वय व वेताची संख्या : जनावराचे वय जसे वाढते तसतसे दुधातील फॅटचे प्रमाण कमी कमी होत असते. साधारणपणे ७ ते ८ वितांनंतर दुधातील फॅटचे प्रमाणात लक्षणीय घट होते. आपल्या कळपात ५ ते ९ वर्ष वयाच्या गाई किंवा म्हशी ठेवल्यास दूध उत्पादन चांगले मिळते व फॅटचे प्रमाणपण योग्य राहते. ७) ऋतुमानाचे दुधाच्या फॅटवर परिणाम- पावसाळ्यात, हिवाळ्यात हिरवा चारा मुबलक असल्याने जनावराचे दूध उत्पादन वाढते. आणि दुधातील फॅटचे प्रमाण कमी आढळते. याउलट उन्हाळ्यात कोरड्या वैरणीचा समावेश असल्याने दुधातील फॅट वाढलेले दिसून येते तसेच उन्हाळ्यात तापमानात जास्त वाढ झाल्यास जनावरे जास्त पाणी पितात व कमी चारा खातात अशा वेळी त्यांच्या शरीरातील तापमान वाढल्यामुळे दूध उत्पादन आणि फॅटचे प्रमाण कमी होते. शास्त्रीय नियमाने सर्वसाधारणपणे दूध वाढले की फॅटचे प्रमाण कमी होते तर दूध उत्पादन कमी झाले की दुधातील फॅट वाढते.




### महत्वाच्या घटना

१६५६ : शिवाजीमहाराजांनी चंद्रराव मोरे यांचा पराभव करुन रायगड किल्ला ताब्यात घेतला. चैत्र व. ७
१६५६ : चंद्रराव मोरे याचा शिवाजी महाराजांनी पराभव करुन रायगड किल्ला सर केला व आपली राजधानी केली.
१८९६ : आधुनिक ऑलिम्पिक खेळांची ग्रीसमधील अथेन्स येथे सुरूवात झाली. ग्रीक सम्राट थेडोसियस (पहिला) याने घातलेल्या बंदीमुळे १५०० वर्षे हे खेळ बंद होते.
१९१७ : पहिले महायुद्ध अमेरिकेने जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारले.
१९१९ : रौलेट ॲक्टविरुध्द हरताळ पाळण्यात आला.
१९३० : प्रसिद्ध दांडीयात्रेनंतर गांधीजींनी मिठाचा सत्याग्रह सुरू केला.
१९६५ : व्यापारी उपयोग करता येईल अशा प्रकारे संदेशवहन करण्याची सोय असलेला 'अर्ली बर्ड' हा उपग्रह अमेरिकेने अंतराळात सोडला. या उपग्रहामुळे माहिती व करमणुकीच्या क्षेत्रात प्रचंड क्रांती घडली.
१९६६ : भारतीय जलतरणपटू मिहीर सेन यांनी भारत व पाकिस्तानला जोडणारी पाल्कची सामुद्रधुनी पोहून पार केली. इंग्लिश खाडीसह जगातील अनेक खाड्या त्यांनी पार केल्या होत्या.
१९८० : भारतीय जनता पक्षाची स्थापना झाली व अटलबिहारी वाजपेयी तिचे पहिले अध्यक्ष झाले. यानंतर १९८४ मध्ये झालेल्या ८ व्या लोकसभा निवडणूकांमध्ये या पक्षाला दुसर्या क्रमांकाची मते मिळुनही फक्त दोनच जागा मिळाल्या!
१९९८ : स्तनांचा कर्करोग बरा करणार्या टॅमॉक्सीफेन या औषधाच्या चाचणीचे निकाल जाहीर करण्यात आले. या औषधामुळे होणार्या दुष्परिणामांमुळे गर्भाशयाच्या कर्करोगाची शक्यता वाढते, असे जाहीर करण्यात आले.
१९९८ : भारतापर्यंत सहज पोहोचू शकणार्या मध्यम पल्ल्याच्या क्षेपणास्त्रांची पाकिस्तानने यशस्वी चाचणी केली.
१९९८ : पाकिस्तानने मध्यम पल्ल्यांच्या क्षेपणास्त्रांची (भारतावर मारा करण्याची क्षमता असणारी) चाचणी केली.
२००० : 'मीर' या रशियाच्या अंतरिक्ष प्रयोगशाळेला जीवदान देण्यासाठी सोडलेले 'सोयूझ' हे अंतराळयान 'मीर'ला भेटले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७७३ : जेम्स मिल स्कॉटिश तत्त्ववेत्ते, इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ जून १८३६)
१८६४ : सर विल्यम हार्डी ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: २३ जानेवारी १९३४)
१८८६ : ब्रिटीश कालीन भारतातील सर्वात मोठी रियासत हैदराबाद येथील निजाम संस्थेचे शेवटचे शासक निजाम उस्मान अली खान यांचा जन्मदिन.
१८९० : अली सिकंदर ऊर्फ 'जिगर मोरादाबादी' उर्दू कवी व शायर (मृत्यू: ९ सप्टेंबर १९६०)
१८९० : फोक्कर एअरक्राफ्ट मॅनुफॅक्चर चे निर्माते अँटनी फोक्कर यांचा जन्म. (मृत्यू: २३ डिसेंबर १९३९)
१८९२ : डग्लस एअरक्राफ्ट कंपनी चे निर्माते डोनाल्ड विल्स डग्लस यांकेह जन्म. (मृत्यू: १ फेब्रुवारी १९८१)
१९०९ : जी. एन. जोशी भावगीतगायक व संगीतकार. एच. एम. व्ही. या कंपनीत काम करत असताना त्यांनी अनेक नवीन गायकांना संधी देऊन त्यांच्या ध्वनिमुद्रिका काढल्या. (मृत्यू: २२ सप्टेंबर १९९४)
१९१७ : 'काव्यतीर्थ' हणमंत नरहर जोशी तथा कवी सुधांशु मराठी कथाकार व कवी (मृत्यू: १८ नोव्हेंबर २००६)
१९१९ : रघुनाथ विष्णू पंडित कोंकणी कवी (मृत्यू:)
१९२७ : विष्णू महेश्वर ऊर्फ 'व्ही. एम.' तथा दादासाहेब जोग उद्योजक (मृत्यू: २८ जून २०००)
१९२८ : जेम्स वॉटसन फ्रान्सिस क्रीक व मॉरिस विल्कीन्स या जोडीदारांसह डीएनएची संरचना स्पष्ट करणारे नोबेल पारितोषिक (१९६२) विजेते जैवरसायनशास्त्रज्ञ
१९३१ : रमा दासगुप्ता तथा सुचित्रा सेन बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेत्री. उत्तमकुमारबरोबर त्यांची जोडी बंगाली चित्रपटांत चांगलीच गाजली. (मृत्यू: १७ जानेवारी २०१४ कोलकता, पश्चिम बंगाल)
१९५६ : दिलीप वेंगसरकर क्रिकेटपटू व प्रबंधक
१९७१ : प्रसिद्ध चित्रपट अभिनेते संजय सुरी यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

११९९ : रिचर्ड (पहिला) इंग्लंडचा राजा (जन्म: ८ सप्टेंबर ११५७)
१९५५ : धर्मभास्कर विनायक महाराजा मसूरकर यांचे निधन.
१९७३ : भारतीय केरळ साहित्य अकादमी पुरस्कार प्राप्त निबंध लेखक मल्याळम साहित्य समिक्षक कारिककट्ट मराठू कुट्टीकृष्ण मारार यांचे निधन.
१९८१ : शंकर धोंडो तथा मामा क्षीरसागर मानवधर्माचे उपासक. विदर्भातील दर्यापूर येथील प्रबोधन विद्यालय, कोल्हापूरचा ग्रामसेवाश्रम व कोरगावकर धर्मादाय संस्था, वरोड्याचे आनंदवन, माधानचे कस्तुरबाधाम, नागपूरचा मातृसेवासंघ, देवरुखचे मातृमंदिर इ. अनेक संस्थांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.
१९८३ : जनरल जयंतीनाथ चौधरी भारताचे लष्करप्रमुख (१९६२ १९६६), हैदराबादचे लष्करी प्रशासक (१९४८ १९४९) व भारताचे कॅनडातील राजदूत, पद्?मविभूषण (जन्म: १० जून १९०८)
१९८९ : पन्नालाल पटेल ज्ञानपीठ पारितोषिक विजेते गुजराथी कथा-कादंबरीकार. चारशेहून अधिक कथांचे २५ संग्रह, ३२ कादंबर्या, ५ नाटके, बालसाहित्य यासारखी विपुल साहित्यसंपदा त्यांच्या नावावर आहे. (जन्म: ७ मे १९१२ मांडली, डुंगरपूर, राजस्थान)
१९९० : माकप नेते व राजकारणी तसचं कामगार संघटनेचे नेते भालचंद्र त्र्यंबक रणदिवे यांचे निधन.
१९९२ : आयझॅक असिमॉव्ह अमेरिकन जीवरसायनशास्त्रज्ञ आणि विज्ञानकथालेखक (जन्म: २ जानेवारी १९२०)
२००१ : भारताचे माजी ६ वे उपपंतप्रधान चौधरी देवीलाल यांचे निधन.

# मराठवाडा - विदर्भाला जोडणारा ६० कोटींचा लक्ष्मण सेतू

## एका वर्षात उभा राहील गोपतपिंपळगाव - उक्कडगावचा पुल

गेवराई । प्रतिनिधी

ग्रामीण भागातील रहदरीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला आणि मराठवाठा-विदर्भाला जोडणाऱ्या गोपतपिंपळगाव ता.गेवराई जि.बीड - उक्कडगाव ता.घनसांगवी जि. जालना पुलाचे काम वेगाने सुरू झाले असून, वर्षभरात हा पुल रहदारीसाठी उपयोगात येणार असल्याने, गोदाकाठाच्या गावांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, जालना जिल्ह्यातील काही पुढाऱ्यांनी अनंत अडथळे आणून ही, आमदार लक्ष्मण पवार यांच्या प्रमाणीकपणा मुळे ना. नितीन गडकरी यांनी गोदापात्रात उभा राहत असलेल्या पुलाच्या बांधकामाला तब्बल ६० कोटी रू देऊन, पवारांच्या पाठपुराव्याला पाठिंबा दिला. तुम्ही म्हणाल त्याच ठिकाणी हा पुल योग्य आहे, अशी कौतुकाची थाप ही ना. नितीन गडकरी यांनी मारली. अखेर, पुलाच्या बांधकामाला सुरुवात झाली आहे.



गेवराई मतदारसंघात रस्त्यांच्या कामांना पून्हा वेग आला असून, उद्धव ठाकरे यांच्या अडीच वर्षाच्या कालखंडात कामाची अडवणूक करून, विरोधी गटाच्या आमदारांना मानसिक त्रास दिल्याने, विकासाची कामे थांबली होती. तसेच, नव्या प्रस्तावांना गतिरोधक निर्माण झाला होता. अडीच वर्षानंतर पून्हा देवेंद्र फडणवीस, एकनाथराव शिंदे , अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली महा युतीचे सरकार आले. त्यामुळे, गेवराई मतदारसंघात गेवराई चे पाटील म्हणतील, सांगतील त्या लोकोपयोगी कामांना प्राधान्य दिले गेले. त्याचाच एक भाग म्हणून , गेवराई मतदारसंघातील आणि गोदाकाठच्या गोपतपिंपळगाव पुलाच्या बांधकामाला निधीसह मंजुरी देण्यात आल्याने, मराठवाडा - विदर्भाला जोडणारा'' लक्ष्मण सेतू'' वर्षभरात रहदारीसाठी उपयोगात येणार आहे. ग्रामीण भागातील रहदरीसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला आणि मराठवाठा-विदर्भाला जोडणाऱ्या गोपतपिंपळगाव ता.गेवराई जि.बीड - उक्कडगाव ता.घनसांगवी जि. जालना पुलाचे काम वेगाने सुरू झाले आहे. एन.पी. इन्फ्रा. पुणे, या कंपनीकडून पुलाचे काम सुरू करण्यात आलेले आहे. एका वर्षात या पुलाचा रहदारीसाठी उपयोग होईल, त्यामुळे, गोदाकाठाच्या गावांना दिलासा मिळाला आहे. जवळपास ६० कोटी रू खर्चाचा हा पुल गोपतपिंपळगाव गोदापात्रात उभा करण्यात येत आहे. पुलाची निर्मिती झाल्यानंतर, उक्कडगाव ता. घनसांगवी जि. जालना येथील महत्त्वाची बाजारपेठेत सहज उपलब्ध होणार आहे. जालना, देऊळगावराजा, गजानन महाराजांचे शेगाव,टुनकी, कुंभारपिंपळगाव, शिवली, विरेगाव, लोणार, खामगाव परिसरातल्या प्रवाशांना, या पुलावरून थेट बीड , लातूर , सोलापूर, गेवराई, माजलगाव परिसरात येता - जाता येईल. त्या शिवाय विदर्भातील भाविकांना भारतातले प्रसिद्ध शनि देवस्थान राक्षसभुवन , नगर मार्गे पुणे, किंवा विशाखापट्टणम राष्ट्रीय महामार्गावर सहज येता - जाता येणार आहे. एकुणच गोपतपिंपळगाव- उक्कडगाव च्या गोदाकाठचा हा पुल प्रवासाचे अंतर कमी करणारा मार्ग ठरणार आहे.

आमदार पवार यांना गेल्या पंचवार्षिक कार्यकाळात ''कार्यसम्राट'' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. दहा वर्षाच्या कालखंडात रस्ता, पाणी आणि वीज, या तीन गोष्टी कडे त्यांनी लक्ष दिले आहे. सध्या गेवराई मतदारसंघात रस्ता कामांचे वेग पाहता, ते कार्यसम्राट की रस्ते सम्राट, असा प्रश्न चर्चेत आला आहे. कामे सुरू आहेत. पण, उद्घाटन नाही की गाजावाजा नाही. कामावर लक्ष देणे. कामाचा दर्जा प्रत्यक्ष जाऊन पाहणे, हेच उद्घाटन असल्याचे त्यांचे म्हणणे आहे. मतदारसंघातील जनता खूप हुशार आहे. त्यांना कळते, कामाचा गडी कोण ? त्यामुळेच, एवढे अडथळे येऊन ही, जनतेने दुसर्यांदा आशीर्वाद दिला की नाही, अशी मिश्किल प्रतिक्रिया ते व्यक्त करत असतात. हा पुल गोदाकाठच्या जवळच्या गावांना आर्थिक उलाढालीसाठी महत्वाचा राहील. गोपतपिंपळगाव गावा पासून गेवराईच्या दिशेने काठोडा तांडा पर्यंत चा रस्ता सिमेंट चा करण्यात येणार असल्याने, त्याचा ही उपयोग होईल, अशी माहिती आमदार पवार यांनी दिली आहे. दरम्यान, पर्यायी व्यवस्थेचा उपयोगी भाग म्हणून, गोपतपिंपळगाव-उक्कडगाव च्या गोदापात्रातला पुल ग्रामीण भागातील दळणवळण सुकर होईल, या दृष्टिकोनातून हा पुल गोदाकाठच्या गावांना समाधान देणारा असून, मराठवाडा - विदर्भातील गावांना जोडणारा मार्ग लक्ष्मण सेतू ,या नावाने प्रसिद्धीस येईल, हे मात्र खरे आहे.

---

# सोशल मीडिया वरून चुकीचा व्हिडिओ व्हायरल

## ज्येष्ठ कुल्फी व्यावसायिकाची विनाकारण बदनामी

बीड । प्रतिनिधी

शहरातील सुप्रसिद्ध गुलफाम कुल्फीचे संचालक ज्येष्ठ कुल्फी व्यावसायिक शेख इसाक भाई यांचा कुणीतरी सोशल मीडिया वरून एक चुकीचा व्हिडिओ व्हायरल केला. सदरील व्हिडिओ गुपचूपरित्या उंच इमारतीवरून चित्रित केल्याचे स्पष्ट दिसत असून चुकीच्या अँगलने चित्रीकरण करून सोशल मीडिया वरून या व्हिडिओ सोबत चुकीची टॅग लाईन टाकून त्यांची विनाकारण बदनामी केली जात असल्याचे इसाक भाई यांचे पुत्र शेख असद यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, शेख इसाक भाई गेल्या काही दिवसापासून पवित्र रमजान महिन्यात मशीदीत ऐतेकाफ मध्ये बसले आहेत. ऐतेकाफ मध्ये बसलेली व्यक्ती या काळात मशिदी बाहेर निघू शकत नाही. त्याचा बाहेरच्या जगाशी संबंध तुटतो मात्र त्यांचे पुत्र शेख असद यांच्या मोबाईलवर इसाक भाई यांचा हा व्हिडिओ सोशल मीडिया वरून आला. तो पाहिल्यानंतर त्यांनी मशिदीत जाऊन शेख इसाक भाई यांच्याशी बोलून हा प्रकार सांगितल्यावर त्यांनी सांगितले की, ते कुल्फी दिल्यानंतर रिकाम्या झालेल्या साच्यात कुल्फी तयार करण्यासाठी माल भरत असताना साच्यामध्ये टाकलेला माल खालपर्यंत गेला की नाही हे प्रत्येक वेळी वाकून पाहत होते. कारण माल पिवर व घट्ट असल्याने खाली लवकर जात नाही. तेव्हा त्यांच्या कुल्फीचा गाळा नेहमीप्रमाणे रस्त्यावर उभा होता. त्याचवेळी कुणीतरी जवळपासच्या घरावरून त्यांचा व्हिडिओ तयार केला व त्या व्हिडिओ सोबत बघा हा कुल्फीवाला साच्यात थुंकून कसा कुल्फी बनवतो आहे अशी टॅग लाईन टाकून तो व्हिडिओ व्हायरल केला. साच्यात थुंकून कुल्फी तयार करण्याचा आरोप हा सर्वस्वी चुकीचा असून कुणीतरी अजाणतेपणे किंवा खोडसाळपणे हा प्रकार केल्याचे त्यांनी म्हटले. त्यांचे पुत्र शेख असदने दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे की, इसाक भाई हे तारुण्यापासून ते आता वयोवृद्ध होण्यापर्यंत संपूर्ण बीड शहरात फिरून उच्च प्रतीची दर्जेदार व चविष्ट गुलफाम कुल्फी विकतात. आजपर्यंत कुल्फीच्या गुणवत्तेमध्ये किंवा इतर कोणतीही तक्रार गुलफाम कुल्फी विषयी कोणीही केली नाही परंतु हा व्हिडिओ बनवून चुकीची टॅग लाईन टाकून व्हायरल केल्यामुळे गुलफाम कुल्फी व इसाक भाई यांची विनाकारण बदनामी करण्यात आली आहे. तरी कृपया कोणीही चुकीच्या व्हिडिओवर विश्वास करू नये. इसाक भाई ऐतेकाफ संपल्यानंतर रमजान ईद च्या दुसऱ्या दिवसापासून पूर्ववत कुल्फी प्रेमींच्या सेवेत गुलफाम कुल्फी घेऊन हजर होतील असे त्यांचे पुत्र शेख असद यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकातून म्हटले आहे.

---

# धनगर समाज म्हणजे कढीपत्ता, वाटला काय?-दत्ता वाकसे

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. निवडणूकी संबंधाने काही मतदार सामाजिक क्षेत्रातील सामाजिक कार्यकर्ते.आपले परखड मत व्यक्त करतांना दिसत आहे, तर काही चुप्पी साधून आहेत. भाजप,शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी पक्षाशी बांधील असलेले आपल्याच उमेदवारांची री ओढत आहे आणि त्यांच्याकडून तेच अपेक्षित असणार यात शंका नसावी. राजकीय पक्षाशी देणेघेणे नसलेल्या सामाजिक नेतृत्व असलेले शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे राष्ट्रीय व्हाईस प्रेसिडेंट दत्ता वाकसे यांनी राजकीय पक्षांना निवडणुकीमध्ये वापर केला असल्याचा अनुषंगाने प्रखड मत मांडले आहे.

आमचा समाज म्हणजे कढीपत्ता.वाटला काय? ताकाच्या कढीत चवीसाठी टाकायचा, आवडला तर खायचा नाही तर वाटीच्या बाहेर काढून ठेवायचा. वाड्या वस्त्यावर भटक्या विमुक्त.

मेंढपाळ असलेला हा समाज प्रामाणिकपणे मतदानाच्या माध्यमातून मतदान करतो परंतु. त्या समाजाला मात्र एकदा का त्यांचे मतदान आपल्या पारड्यात पडले पुन्हा मात्र त्यांच्याकडे साधे डोकून पाहिले जात नाही. आज परिस्थिती पाहिली तर धनगर समाज हा डोंगरदऱ्यामध्ये फिरून आपली उपजीविका मेंढपाळ व्यवसायाच्या माध्यमातून भागवत आहे. परंतु त्यांना निवडणुका आल्या की आश्वासन दिले जातात. आम्ही सत्तेमध्ये आलो की तुमच्या एसटी अनुसूचित जमातीच्या आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावू. तुमचे विविध प्रश्न सोडवू परंतु. या समाजाला आत्तापर्यंत राज्यकर्त्यांकडून व आश्वासन देणाऱ्या उमेदवाराकडून कधीही न्याय मिळाला नाही.

आज परिस्थिती पाहिली तर वाड्यावर वस्त्यावर डोंगरदऱ्यामध्ये छोटे छोटे कुटुंब राहतात व त्यांची धार्मिक क्षेत्रावर मोठ्या प्रमाणात श्रद्धा असल्यामुळे त्या ठिकाणी बिरोबा खंडोबा शिदोबा. यासारखे अनेक मंदिर आहेत परंतु या मंदिराचा उद्धार व्हावा या मंदिराला निधी मिळावा त्यांची ही अपेक्षा असते परंतु. निवडणुकांमध्ये मोठे मोठे आश्वासन गाजर दिले जाते त्यानंतर मात्र समाज वार्यावर सोडला जातो. त्यामुळे या समाजाचा फक्त भाजीमध्ये जसा कढीपत्ता वापरला जातो तसा वापर केला जातो खायचा असेल तर खायचा नाही तर फेकून द्यायचा. त्यामुळे आता मात्र धनगर समाजाने योग्य धडा शिकवणे काळाची गरज आहे. आपण वेळोवेळी ज्यांना मतदान करतो तेच आपला फक्त मतापुरता वापर करून घेतात त्यामुळे विचारपूर्वक यावेळी बीड जिल्ह्यातील सुज्ञ धनगर समाजाच्या युवकांनी. व धनगर समाजाने आपले हक्काचे मतदान जो आपल्याला न्याय दिन त्याच्या पारध्यामध्ये टाकावे असे साद्विक आव्हान शेफर्ड इंडिया इंटरनॅशनल संघटनेचे राष्ट्रीय उपाध्यक्ष दत्ता वाकसे यांनी केले आहे

---

# शिवानी गाडेकर पाटील चोविसाव्या वर्षी बनली डॉक्टर !

शिरूर । प्रतिनिधी

शिरूर कासार येथील रहिवाशी कु.शिवानी गोविंद गाडेकर पाटील हीला चोविसाव्या वर्षी वैद्यकिय क्षेत्तातील पदवी प्रमाण पत्र शुक्रवारी दिक्षांत समारोहात प्रदान करण्यात आले .बारावी नंतर वैद्यकिय क्षेत्रात काम करायचे ही जिद्द मनी बाळगुन तीने सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालयात प्रवेश घेतला ,चिकाटीने अभ्यास करून तीने वैद्यकिय कोर्स पुर्ण केला .शुक्रवारी बीड येथे ऑल इंडीया सेंट्रल काउन्सिल ऑफ होमिओपॅथी चे मा.प्रसिडंट व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ अरूण भस्मे यांचे हस्ते दिक्षांत समारोहात प्रमाण पत्र देऊन सन्मानीत करण्यात आले .

यावेळी उप प्राचार्य गणेश पांगारकर , डॉ.अंजली पांगारकर , डॉ.सुरेश तोष्णीवाल सह डॉ शिवाणीचे आई वडील व बंधू उपस्थित होते .पत्रकार विजयकुमार गाडेकर यांची डॉ शिवानी ही नात आहे. शिवानी गाडेकरचे डॉक्टर झाल्याबद्दल सिध्देश्वर संस्थानचे महंत स्वामी विवेकानंद शास्त्री , नगरपंचायत नगराध्यक्ष रोहिदास पाटील,मा.नगराध्यक्ष दत्ता पाटील,गटनेते गणेश भांडेकर ,सेवानिवृत्त पोलीस अधिकारी रावसाहेब पाटील ,मा.सरपंच सुनिल पाटील , प्रा.भालचंद्र भांडेकर , अनिल गाडेकर ,भाऊसाहेब गाडेकर , आदीसह विविध क्षेत्रातून स्वागत होत आहे .

---

# सिंदफणा पब्लिक स्कूल येथे आईसक्रीम पार्टीने नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात

माजलगाव

सिंदफणा पब्लिक स्कूलचे नवीन शैक्षणिक वर्ष २०२४-२५ सोमवार दिनांक १ एप्रिल पासून शाळेच्या सचिव मंगलाताई सोळंके, समन्वयक नीला देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली आणि शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत धूमधडाक्यात सुरू झाले. नवीन शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत ढोल ताशांच्या गजरात आणि विद्यार्थ्यांसाठी आईसक्रीम पार्टीचे आयोजन करून करण्यात आले.

फुले, रांगोळ्या, विविध रोपांनी शाळा सजवण्यात आली होती. आपल्या मुलांना शाळेत नवीन शैक्षणिक वर्षात पाठवण्यासाठी आणि प्रवेश प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी पालकांना सुध्दा मार्गदर्शन करून जागरूकता निर्माण करण्यात आली. पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत सांस्कृतिक कार्यक्रमाने करण्यात आले. यामध्ये सखाराम जोशी, प्रवीण मडके यांनी अनुक्रमे एकपात्री नाट्य प्रयोग, कविता यांचे सादरीकरण केले. पहिल्या दिवसापासूनच मुलांना दुपारचे जेवण देण्यात आले.पहिल्या दिवशीच शाळेत विद्यार्थ्यांची उपस्थिती लक्षणीय होती. याप्रसंगी बोलताना प्राचार्य अन्वर शेख म्हणाले की, सीबीएसई च्या परिपत्रकानुसार नवीन शैक्षणिक वर्ष एप्रिल पासून सुरू करण्याचे निर्देश सर्व सीबीएसई सलग्नित शाळांना दिले आहेत. त्यानुसार सर्व शाळा एप्रिल पासून सुरू झाल्या असून, ज्या पालकांना सी बी एस ई बोर्डाच्या शाळेत आपल्या पाल्याचा प्रवेश करायचा आहे त्यांनी जुन महिन्याची प्रतीक्षा न करता लवकरात लवकर आपल्या पाल्याचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन त्यांनी केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवसापासूनच अभ्यासाकडे लक्ष द्यावे असे प्रतिपादन शाळेचे उपप्राचार्य राहुल कदम यांनी केले

---

# मुक्ताराम आव्हाड अमरसिंह पंडित यांच्या राष्ट्रवादीत दाखल

गेवराई । प्रतिनिधी

नागझरी येथील बदामराव पंडितांचे खंदे समर्थक तथा संजय गांधी निराधार समितीचे सदस्य मुक्ताराम आव्हाड यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह माजी आमदार तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे प्रदेश सरचिटणीस अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे स्वागत केले.



नागझरी येथील शिवसेनेचे सक्रिय कार्यकर्ते तथा संजय गांधी निराधार समितीचे सदस्य मुक्तराम आव्हाड यांनी आपले समर्थक बुद्धभुषण जोगदंड, अमर भवर, माऊली भवर, सुभाष भुसारे, विकास आव्हाड, लखन झाकणे, कार्तीक गुंड, बाबासाहेब जोगदंड, रोहिदास मोटे, संतोष जोगदंड, बंडु शिंदे, संदिप आव्हाड, सुभाष डिंगरे, सोमनाथ उधे, माऊली वाघ, अभिषेक काकडे, राजेंद्र जोगदंड, अंकुश जोगदंड, गणेश जोगदंड, आकाश गुंड, सचिन आव्हाड, राम झाकणे, गणेश आव्हाड, संदिप आव्हाड, विशाल भुसारे, विकास जोगदंड, संतोष पवार, शाम झिणे, महेश भवर, उदय शिंदे, अदित्य भुसारे, राम पवार, सुदाम पोटफोडे आदींनी बदामरावांना आणि युद्धाजित पंडित यांच्या निक्रीय कारभारा कंटाळुन माजी आमदार अमरसिंह पंडित आणि जि.प.चे माजी अध्यक्ष विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवुन अमरसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आपल्या शेकडो समर्थकांसह कृष्णाई येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीत प्रवेश केला. अमरसिंह पंडित यांनी सर्वांचे राष्ट्रवादीत स्वागत केले. यावेळी राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष भाऊसाहेब नाटकर, बाजार समितीचे सभापती मुजीब पठाण, माजी सभापती कुमारराव ढाकणे, माजी जि.प.सदस्य बाबुराव काकडे, शहराध्यक्ष दिपक आतकरे, सरपंच मोहंमद यासीन, सरवर पठाण, राष्ट्रवादीचे तालुका उपाध्यक्ष दत्ता दाभाडे, राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष अक्षय पवार, विलास चव्हाण, कल्याण चव्हाण, शिवाजी गोडबोले, विशाल उमप, अमित वैद्य आदींसह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

---

# 'अलविराच्या'शब्दाखातर'अक्षयचा' एक दिवस रोजा उपवास

माजलगाव । प्रतिनिधी

चिमुकल्या अलविरा शेखचा २३ व्या रोजा निमित्त आयुष्यातील पहिला रोजा उपवास होता. यानिमित्त तिने आपल्या शेजारी राहणाऱ्या माणसभाऊ अक्षयला 'भाई आप भी रोजा पकडो ना'असा निरागस शब्द केल्या.त्या शब्दाने अक्षयचाही एक दिवसाचा रोजा उपवास घडून आला.दरम्यान या निमित्त समाजात भाईचारा वृद्धिगत करणाऱ्या या बहिणभावाचे कौतुक होत आहे.



रमजानच्या रोजा उपवासाचे मुस्लिम समाजात अन्यनसाधारण महत्त्व आहे.घराघरात लहान थोरांपासून हा उपवास केला जातो. ४३ अंशाच्या कडक उन्हात अन्न पाण्याशिवाय १४ तास रोजा पकडणे'इट्स नॉट जोक!'परंतु इस्लाम धर्मातील फर्ज,कर्तव्य या भावनेतून रोजा ठेवल्या जातो. लहानात लहान मुले,मुली आपल्या आयुष्यातील पहिल्या रोजाची सुरुवात रमजानमध्ये करत असतात.असाच आयुष्यातील पहिला रोजा शहरातील सिद्धीकी कॉलनी येथील अलविरा अर्शद शेख या चिमुकलीचा होता. यानिमित्ताने तिने आपल्या शेजारी राहणाऱ्या माणसभाऊ अक्षय राज गायकवाड याला'भाई आप रोजा पकडो ना'असा प्रश्न केला.आणि अक्षयनेही चिमुकल्या बहिणीच्या शब्दाखातर एक दिवसाचा रोजा उपवास केला.यासाठी अलविराने अक्षयच्या उपास सुरू करण्यापूर्वी अल्पोहार'सहर'सह'इफ्तारी'म्हणजे रोजा सोडण्यापर्यंत कुटुंबीयांमार्फत व्यवस्था केली होती.१४ तास अन्न पाण्याशिवाय रोजा उपवासानिमित्त कटलेला दिवस अक्षयसाठी त्याग, समर्पण याची जाणीव देणारा ठरला.यानिमित्ताने समाजात भाईचारा वृद्धिगत करणाऱ्या या बहिण भावाचे कौतुक होत आहे.

---

# आदर्श पिढी निर्माण होणे काळाची गरज!

## व्यसनमुक्तीकडून शिक्षणाकडे अभियानात मान्यवरांचे प्रतिपादन

बीड । प्रतिनिधी

कोणत्याही समाजातील व्यक्तीने व्यसनाधीन होता कामा नये. त्यामुळे कौटुंबिक कलह वाढून समाजाचेही मोठे नुकसान होते. त्यामुळे समाजाला या वाईट गोष्टीपासून दूर ठेवण्यासाठी व्यसनमुक्तीकडून शिक्षणाकडे अभियान मोलाचे ठरणार आहे. असल्याची प्रतिपादन सूर्यकांत जोगदंड, सुमेध जोगदंड यांनी व्यक्त केले.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३३ व्या जयंतीनिमित्त बीड शहरातील इंदिरा नगर भागात गुरुवार (दि.४) रोजी व्यसनमुक्तीकडून शिक्षणाकडे अभियान राबविण्यात आले. त्यावेळी उपस्थित समुदायास संबोधित करतांना सूर्यकांत जोगदंड, सुमेध जोगदंड बोलत होते.यावेळी जयंती उत्सव समिती प्रमुख अरुणाताई आठवले, अनिता डोंगरे, प्रा.पांडुरंग सुतार, भास्कर सरपते, घाडगे सर, प्रणित सरवदे, प्रा.रोहित डोंगरे यांची उपस्थिती होती.



यावेळी उपस्थित त्यांना संबोधित करताना मान्यवर म्हणाले की, आज घडीला तरुणांमध्ये व्यसनाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढताना दिसून येत आहे. ही बाब चांगल्या समाजासाठी येणाऱ्या काळात हानी पोहोचविणारी आहे. त्यामुळे समाजातील तरुणांकडे विशेष लक्ष देऊन त्यांना वेळोवेळी मार्गदर्शन करणे गरजेचे होत चालले आहे. त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती बीड यांच्याकडून व्यसनमुक्तीकडून शिक्षणाकडे अभियान राबविले जात आहे. समाजामध्ये एक आदर्श पिढी निर्माण व्हावी यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे.या उपक्रमाला चांगला प्रतिसाद मिळतो आहे. असे मनोगत सूर्यकांत जोगदंड सुमेध जोगदंड यांनी व्यक्त केले.

व्यसनमुक्तीकडून शिक्षणाकडे अभियान कार्यक्रमाचे प्रास्ताविक भगवान कांडेकर यांनी केले. सूत्रसंचालन अंकुश चव्हाण तर आभार रमेश जावळे यांनी केले. सदरील अभियान यशस्वी करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीने मोलाचे परिश्रम घेतले.

---

# अंजली वनवे हिचे नवोदय परीक्षेत यश



दिंद्रुड । प्रतिनिधी

दिंद्रुड येथील इंदिरा गांधी कन्या विद्यालयाची विद्यार्थिनी अंजली युवराज वनवे इयत्ता आठवी नवोदय परीक्षेत उत्तीर्ण होत गढी येथील पीएम श्री नवोदय विद्यालयात पुढील शिक्षणासाठी पात्र ठरली आहे. चोपनवाडी या गावातून नवोदय विद्यालयात प्रवेश मिळवणारी पहिली विद्यार्थीनी म्हणून तिच्या यशाबाबत चोपनवाडी ग्रामस्थांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे.

१० फेब्रुवारी रोजी गेवराई तालुक्यातील गढी येथे इयत्ता नववी नवोदय प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. ४ एप्रिल रोजी त्याचा निकाल घोषित करण्यात आला.दिंद्रुड येथील इंदिरा गांधी कन्या शाळेची विद्यार्थिनी अंजली युवराज वनवे हिने या परीक्षेत यश संपादन करीत नवोदय विद्यालयातील इयत्ता बारावी पर्यंतच्या शिक्षणासाठी प्रवेश पात्र ठरली. तिच्या या यशाबाबत इंदिरा गांधी कन्या शाळेचे अध्यक्ष मोहनराव सोळंके, सचिव आर.व्ही सोळंके यांच्यासह मुख्याध्यापक अशोक बोचरे, वर्गशिक्षक विशाल डाके, ज्ञानदीप कोचिंग क्लासेस चे संचालक बाबुराव गिते, उषा गिते, चोपनवाडीचे सरपंच सोनाली विलास बडे यांनी अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.



# गोंधळी, धनगर, बंजारा, भिल्ल समाजासह अठरापगड जातीची मिळतेयं पंकजाताई मुंडेंना साथ

## बीडच्या बैठकीत समाजातील कार्यकर्त्यांनी दिली एकमुखी पसंती ; सर्वसमावेशक आणि विकासाभिमुख नेतृत्व पंकजाताई मुंडेच

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील सर्व समाज घटकांना सोबत घेऊन पालकमंत्री पदाच्या कार्यकाळात केलेल्या अभूतपूर्व विकास कामांमुळे भारतीय जनता पक्ष आणि महायुतीच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांना अनेक सामाजिक घटक आणि राजकीय संघटनांचा पाठिंबा मिळतो आहे. बीड तालुक्यातील भारतीय जनता पक्षाच्या बूथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, सुपर वॉरीअर्सच्या बैठकीत याचा प्रत्यय आला.

भारतीय जनता पक्षाच्या वतीने पदाधिकारी, कार्यकर्ते आणि बूथ प्रमुखांच्या मेळाव्यात बीड तालुक्यातील गोंधळी समाज,धनगर समाज, बंजारा समाज, भिल्ल समाज आणि लोक कलावंत जिल्हा संघटनेने पंकजाताई मुंडे यांना जाहीर पाठिंबा दिला.







यावेळी सर्व समाज घटकांनी पंकजाताई मुंडे यांचे स्वागत केले. आगामी लोकसभा निवडणुकीत एकजुटीने पंकजाताईंच्या पाठीशी मतदान रुपी आशीर्वाद उभे करून त्यांना विक्रमी मताधिक्याने लोकसभेत पाठवण्याचा संकल्प केला, याप्रसंगी पंकजाताई मुंडे यांनी सर्व समाज घटकांचे आभार मानून पुढील काळात समाजाचे प्रलंबित प्रश्न मार्गी लावू असा विश्वास दिला.

बूथप्रमुख आणि कार्यकर्त्यांशी साधला संवाद भारतीय जनता पक्षाच्या बीड विधानसभा क्षेत्रातील बूथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख,सुपर वॉरीअर्स आणि पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बैठकीत उपस्थितांशी पंकजाताई मुंडे यांनी संवाद साधला.

लोकसभेत आपले प्रतिनिधित्व करण्यासाठी आपल्या जिल्ह्याला शोभेल असे मताधिक्य देण्यासाठी संपूर्ण योगदान देऊ आणि पुन्हा एकदा बीड जिल्ह्यातील शेतकरी,शेतमजूर, सामान्य जनता आणि तरुण बांधव, महिला भगिनींच्या अपेक्षा पूर्ण करणार नेतृत्व दिल्लीत पाठवू असा संकल्प याप्रसंगी कार्यकर्त्यांनी केला.

कार्यकर्त्यांच्या ही संकल्पबद्धता लोकसभेच्या महाविजयाची नांदी ठरणार आहे. आजपर्यंत आपण बीड जिल्ह्याची विकास कामांच्या माध्यमातून मशागत केली आहे, आता मतांची पेरणी करून विजयाचे पीक आपल्याला घ्यायचं आहे. आगामी काळात आपण केलेली विकास कामे प्रत्येक बूथवरील शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचवा आणि आपल्या बूथहुन अधिकाधिक मताधिक्य मिळवून दया अस आवाहन याप्रसंगी उपस्थितांना केले.

## मुत्तेमवार, ठाकरे यांच्याविरोधात भाजपची निवडणूक आयोगाकडे तक्रार

**नागपूर । प्रतिनिधी**

काँग्रेसचे माजी खासदार विलास मुत्तेमवार यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर आक्षेपार्ह टीका केली. त्यांच्या पित्याचा अवमान केल्याने तातडीने कारवाई करा, अशी मागणी भाजपतर्फे निवडणूक आयोगाकडे करण्यात आली आहे. याविषयीची माहिती जिल्हाधिकारी आणि जिल्हा



निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. विपीन इटनकर यांना भेटल्यानंतर प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांशी बोलताना दिली.

विलास मुत्तेमवार यांनी अत्यंत खालच्या स्तराच्या भाषेचा वापर केला असल्याने निवडणूक आयोगाने त्यांच्यावर कारवाई करावी, असे निवेदन आम्ही आज जिल्हाधिकारी यांना दिले आहे. आम्हाला अपेक्षा आहे की, मुत्तेमवार यांच्यावर निवडणूक आयोग कारवाई करेल. दरम्यान, काँग्रेसने आपल्या अधिकृत पेजवर 'मी दीक्षाभूमी बोलतोय' असा एक व्हिडिओ टाकला आहे. यात जात, धर्म, पंथाच्या नावावर मत मागणारा हा व्हिडिओ त्यांच्या अधिकृत पेजवर आला आहे. त्यामुळे काँग्रेसचे उमेदवार विकास ठाकरे यांच्यावरदेखील कलम १२३ चे उल्लंघन केल्याप्रकरणी कारवाई करावी, अशी मागणी भाजपने आज निवडणूक आयोगाला केली आहे. निवडणूक धुमशान सुरू होताच रामटेक लोकसभा मतदारसंघात काँग्रेस उमेदवार रश्मी बर्वे यांना जात प्रमाणपत्र रद्द प्रकरणात निवडणूक लढण्यापासून अपात्र व्हावे लागले. मध्यंतरी गडकरी यांच्या मुलाच्या प्रचारसभेतील व्हिडिओने खळबळ उडविली. आता नागपुरातील काँग्रेस उमेदवाराला भाजपने घेरण्याचा प्रयत्न केल्याने कडक उन्हासोबतच नागपूर जिल्ह्यातील निवडणुकीत वातावरण तापल्याचे दिसत आहे. यासंदर्भात मुत्तेमवार यांच्याशी संपर्क होऊ शकला नाही. मात्र, आम्ही लवकरच आमची भूमिका स्पष्ट करणार असल्याचे काँग्रेसचे प्रदेश सोशल मीडिया प्रमुख विशाल मुत्तेमवार यांनी स्पष्ट केले.

## शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय कोकाटे यांचा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश

**मुंबई । प्रतिनिधी**

शिवसेना शिंदे गटाचे माढा संपर्कप्रमुख संजय कोकाटे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये शुक्रवारी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत शेकडो कार्यकर्त्यांसह जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.



राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या उपस्थितीत प्रदेश कार्यालयामध्ये शिवसेना शिंदे गटाचे माढा संपर्कप्रमुख संजय कोकाटे, शिवसेना शिंदे गटाचे विधानसभा प्रमुख रामचंद्र टकले, शिवसेना शिंदे गटाचे सोलापूर जिल्हा उपप्रमुख विनोद पाटील, सुभाष पाटील सरपंच, आहेरगाव, ता. टेभूर्णो, सुनिल गव्हणे विद्यार्थी संघटना, पंढरपूर , इत्यादींचा पक्षप्रवेश झाला आहे. यावेळी संजय कोकाटे संजय पाटील घाटणेकर , अभिजीत पाटील, बळिरामकाका साठे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते. पक्षप्रवेशादरम्यान मार्गदर्शन करताना जयंत पाटील म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष मधल्या काळामध्ये संकटात होता परंतु आता हळूहळू तिकडचे अनुभव येत असल्याने पुन्हा लोक पक्षाशी जुळत आहे असे सांगितले. जयंत पाटील म्हणाले की, महाराष्ट्रातील सामान्य माणसाला राज्यातील जी परिस्थिती आहे त्या संदर्भात प्रचंड राग आणि असंतोष सामान्य माणसांमध्ये आहे. कशा प्रकारे सत्ता टिकवण्याचे सुरू आहे हे आपण आज बघत आहे. सत्तेचा गैरवापर करून दबाव टाकून पक्षात घेण्याचे काम सुरू आहे. १९ मधील निवडणुकीमध्ये देखील असेच सुरू होते त्यावेळेस देखील मी सांगितलं होतं की यांना जर तिकडे याचाच अर्थात तिकडे परिस्थिती चांगली नाही आहे. या निवडणुकीमध्ये महागाईला कंटाळलेल्या जनतेने, बेरोजगार असलेल्या युवकांनी, शेतकऱ्यांच्या मालाला भाव नाही हे सर्व कधी निवडणूक लागते याची वाट बघत होते असा चिमटाही विरोधकांना काढला. पुढे जयंत पाटील म्हणाले की, आमच्याकडे सर्वसामान्य कार्यकर्ते आहेत. तर दुसऱ्या बाजूला सत्तारूढ पक्षाकडे कॉन्टॅक्टर आहे. आमच्या पक्षात एखाद्या व्यक्तींनी प्रवेश केला तर त्यांच्या मागे तपास यंत्रणेच्या माध्यमातून कारवाई करण्यात येते. निवडणुका जर जाहीर झाल्यास तपास यंत्रणेने आपलं काम थांबवलं पाहिजेत. एखादा पक्षाचा कार्यकर्ता उमेदवार म्हणून जर रिंगणात असेल तर त्या नेत्यांवर तुम्ही कारवाई करत आहात याचा अर्थ तुम्ही लोकशाही विरोधात आहात असा अर्थ देशातील जनता काढू शकते असेही यावेळी सांगितले. भाजपला ४०० खासदार निवडून आणायचे आहे ते याकरिता की डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान बदलण्याकरिता यांना खासदार निवडून आणायचे आहे. या देशातील घटना बदलून सर्व अधिकार आपल्याकडे आणण्यासाठी हा प्रयत्न सुरू आहे. देशामध्ये लोकशाही टिकवायची की नाही त्या दृष्टीने ही लोकसभा निवडणूक अतिशय महत्त्वाची आहे आणि हे सर्व तुम्हा आम्हाला ठरवायचं आहे असे सूचक वक्तव्यही केले. जयंत पाटील म्हणाले की, संजू भाऊ कोकाटे तुम्ही योग्य पाऊल टाकलेले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात मी तुमच स्वागत करतो. माढ्यामध्ये पक्ष संघटना बळकट केली तर तिथे तुमच्या शिवाय दुसरे कोणी नाही. पक्ष संघटना बूथ पर्यंत पोहोचवली तर तुमचा सूर्य तुतारीच्या नावाने उगवेल त्यामुळे माझी तुम्हा सर्वांना विनंती आहे की ताकदीने काम करा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले.

## लोकसभेला अर्ज भरण्यावरून काँग्रेस प्रदेश उपाध्यक्षावर बारामतीत हल्ला



**बारामती । प्रतिनिधी**

तू लोकसभेच्या निवडणुकीसाठी अर्ज कसा भरतो, तेच बघतो, असे म्हणत सहाजणांनी काँग्रेसच्या ओबीसी सेलचे राज्याचे उपाध्यक्ष रोहित बनकर यांना बेदम मारहाण केल्याचा प्रकार बारामतीत घडला आहे. या प्रकरणी शहर पोलिसांनी बाबू पवार व त्याच्या अन्य पाच साथीदारांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सोमवारी (दि. ४) दुपारी अडीचच्या सुमारास हा प्रकार घडला.

रोहित बनकर हे त्यांच्या घरी असताना बाबू पवार याने त्यांना फोन केला. तु कुठे आहे, मला तुला भेटायचे आहे, असे त्याने फोनवर सांगितले. मी घरी जेवण करत आहे, असे उत्तर बनकर यांनी दिले. मी घरी भेटण्यासाठी येतो, असे पवार म्हणाला. त्यामुळे जेवण उरकून बनकर हे खाली पार्किंगमध्ये येवून थांबले. १५ मिनिटांनी बाबू पवार, रोहन व अन्य पाचजण दुचाकीवरून तेथे आले. बाबू पवार याने बनकर यांना तू लोकसभेचा अर्ज कसा भरतो, तेच बघतो, तु अर्ज दाखल केला तर तुला जीवानिशी खल्लास करेन, अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांच्या नाकावर मारले. त्यामुळे बनकर यांच्या नाकाला दुखापत झाली. रोहित याने त्यांचे दोन्ही हात धरले. बाबू पवार याने गळा हाताने आवळला. बनकर यांनी जोराने आरडाओरडा केल्याने लोक जमा झाले. त्यामुळे ते तेथून दुचाकींवर पसार झाले, असे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

## महाविकास आघाडीच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने विजयी करण्यासाठी कार्यकर्त्यांनी कामाला लागावे -परमेश्वर सातपुते

**बीड । प्रतिनिधी**

महाविकास आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक साई दत्त मंगल कार्यालय आष्टी येथे पक्षनिरीक्षक जीवनराव गोरे यांच्या अध्यक्षतेखाली व माजी आमदार साहेबराव (नाना) दरेकर,आमदार संदीप भैय्या क्षीरसागर, शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर, माजी आमदार उषा ताई दराडे,जेष्ठ नेत्या सुशीला ताई मोराळे,व सर्व पदाधिकारी व मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाली यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांचा सत्कार करुन सन्मान केला यावेळी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर म्हणाले की, बीड जिल्ह्यातील उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे




शिवसैनिक इमानेइतबारे तळमळीने काम करुन महाविकास आघाडीच्या उमेदवाराचा विजय करतील यात शंका नाही यावेळी जिल्हाप्रमुखकांसोबत जिल्हा समन्वयक संजय भाई महाद्यार, उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर, तालुका प्रमुख सोपानजी मोरे, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर, आष्टी तालुका प्रमुख सुभाष राऊत, पाटोदा तालुका प्रमुख मुकुंद शिंदे, युवासेना पाटोदा शहर प्रमुख अजिंक्य डोरले,, पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक तात्या पवार,किसानसेना तालुकाप्रमुख अशोक घोषीर,संजीव भारती,कॉम्रेड महादेव नागरगोजे, राम खाडे, राजेंद्र सानप,विष्णूपंत घोलप हे उपस्थित होते.

## हेमंत गोडसे पाठोपाठ आता भुसेही म्हणतात, नाशिकची जागा आमचीच

नाशिक : - नाशिक लोकसभा मतदारसंघाच्या जागेवरून महायुतीतील तणाव आता अधिकच वाढला असून, शिवसेना शिंदे गटाचे खासदार हेमंत गोडसे यांच्या पाठोपाठ नाशिकचे पालकमंत्री तथा राज्याचे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री दादा भुसे यांनीदेखील नाशिकची जागा आमचीच असल्याचा दावा केला आहे. त्यामुळे नाशिकच्या जागेवरून महायुतीत अद्यापही घमासान सुरू असल्याचे चित्र आहे.

यंदाची लोकसभा निवडणूक चांगलीच वादळी ठरत आहे. नाशिकच्या जागेवरून महाविकास आघाडीत सुरुवातीला रंगलेला वाद ठाकरे गटाकडून सिन्नरचे माजी आमदार राजाभाऊ वाजे यांच्या उमेदवारीच्या घोषणेनंतर पेल्यातील वादळ ठरले. महाविकास आघाडीचे उमेदवार



म्हणून वाजे यांनी जोरदार प्रचार सुरू केला आहे, तर उमेदवारी न मिळाल्याने नाराज झालेल्या विजय करंजकर यांच्या मनधरणीचे प्रयत्नही ठाकरे गटाकडून सुरू आहेत. महायुतीत मात्र नाशिकची जागा भाजपची, शिंदे गटाची की राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाची यावरूनच रस्सीखेच सुरू आहे.

## मविआला जालन्यात उमेदवार मिळेना

### माजी आमदार कल्याण काळे यांच्या नावाची चर्चा

**जालना । प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील उमेदवारी अर्ज भरण्यास सुरुवात झाली असताना अजूनही अनेक मतदारसंघांत उमेदवारच ठरत नसल्याचे चित्र आहे. अशीच काही अवस्था जालना लोकसभा मतदारसंघात महाविकास आघाडीची झाल्याचे पाहायला मिळत आहे.



भाजपकडून रावसाहेब दानवे यांची उमेदवारी जाहीर झाली, त्यांनी प्रचारही सुरू केला, मात्र महाविकास आघाडीत अजूनही जालन्यातील उमेदवारच निश्चित होत नसल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे हा मतदारसंघ काँग्रेसकडे जाणार असून, माजी आमदार कल्याण काळे यांच्या नावाची चर्चा आहे. पण यावर कोणतीही अधिकृत घोषणा होताना दिसत नाही. जालना लोकसभा मतदारसंघ भाजपचा बालेकिल्ला समजला जातो. मागील पाच लोकसभा निवडणुकीत केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांचा सतत या मतदारसंघातून विजय होताना पाहायला मिळाले. आता सहाव्यांदा रावसाहेब दानवे या मतदारसंघातून आपलं नशीब अजमावत आहेत. पण यंदाच्या निवडणुकीत विरोधकांना दानवेंना तोड देणारा दमदार उमेदवार अजूनही मिळाला नसल्याचे चित्र आहे. महाविकास आघाडीत काँग्रेसला हा मतदारसंघ सुटला असून, काँग्रेसकडून चांगल्या उमेदवाराची शोधाशोध सुरू आहे. अशात माजी आमदार कल्याण काळे यांच्या नावाची चर्चा आहे. काळे यांनी २००९ मध्ये देखील दानवे यांच्या विरोधात निवडणूक लढवत चांगली लढत दिली होती. त्यावेळी त्यांचा अवघ्या ८ हजार ४८२ मतांनी पराभव झाला होता.

## देवेंद्र फडणवीसांची जबरदस्त स्ट्रॅटेजी, सुप्रिया सुळेंचा प्रचार करणाऱ्या उद्योजकाच्या घरी चहापान, इंदापुरात हालचालींना वेग

**इंदापूर । प्रतिनिधी**

बारामती लोकसभा निवडणुकीच्यादृष्टीने अजित पवार आणि हर्षवर्धन पाटील यांच्या कार्यकर्त्यांमध्ये समेट घडवण्यासाठी आणि महायुतीमधील एकोपा वाढवण्यासाठी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शुक्रवारी इंदापूरमध्ये सभा होत आहे. या सभेपूर्वी इंदापूरमध्ये उतरल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी एक महत्त्वाचा डाव टाकल्याची चर्चा आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी इंदापूर येथे सोनाई डेअरीचे चेअरमन प्रवीण माने ( ) यांच्या घरी जाऊन चहापान केले. यानंतर प्रवीण माने आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात काहीवेळ चर्चा झाली. प्रवीण माने हे सुप्रिया सुळे गटातील मानले जातात. ते १५ दिवसांपूर्वीपर्यंत इंदापूरमध्ये सुप्रिया सुळे यांचा प्रचार करत फिरत होते. त्यामुळे आता देवेंद्र फडणवीस यांनी प्रवीण माने यांची भेट घेतल्यानंतर राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.



प्रवीण माने आणि देवेंद्र फडणवीस यांच्यात बंद दाराआड काय चर्चा झाली, याचा नेमका तपशील उपलब्ध झालेला नाही. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी बारामती लोकसभेसाठी प्रवीण माने यांना अजितदादा गटाच्या बाजूने वळवण्यासाठी घरी जाऊन त्यांची भेट घेतल्याची शक्यता आहे. प्रवीण माने जर अजित पवारांसोबत गेले तर इंदापुरात सुप्रिया सुळे यांना फटका बसू शकतो. हर्षवर्धन पाटील यांच्यानंतर फडणवीसांनी इंदापूरमध्ये आणखी एका अजित पवार विरोधकाला आपल्या बाजूने वळवल्यास लोकसभेला सुनेत्रा पवार यांना इंदापूरमधून मोठी आघाडी मिळू शकते.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोनाईचे प्रमुख दशरथ माने आणि त्यांचे पुत्र प्रवीण माने यांची शुक्रवारी दुपारी इंदापूरमधील निवासस्थानी भेट घेतली. मागच्या काही दिवसापर्यंत प्रवीण माने हे सुप्रिया सुळे यांच्यासाठी प्रचार करत होते. परंतु देवेंद्र फडणवीस इंदापुरात उतरल्यानंतर थेट माने कुटुंबीयांच्या घरी गेल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. जेव्हा देवेंद्र फडणवीस प्रवीण माने यांच्या घरी गेले त्या ठिकाणी शिरूरचे वंचितचे उमेदवार मंगलदास बांदल देखील उपस्थित होते. मंगलदास बांदल यांनी मी दशरथ माने यांना भेटण्यासाठी आलो होतो. त्यावेळेस देवेंद्र फडणवीस याठिकाणी आले. देवेंद्र फडणवीस यांच्याशी माझी कोणतीही चर्चा झाली नसल्याचं मंगलदास बांदल यांनी स्पष्ट केले.

### प्रवीण माने यांच्या भेटीनंतर फडणवीस काय म्हणाले?

प्रवीण माने यांच्या घराबाहेर पडल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी म्हटले की, माने दादांशी माझे जुने आणि वैयक्तिक संबंध, ते अनेकवेळा माझ्या घरी येतात. ते बऱ्याच दिवसांपासून मागे लागले होते, तुम्ही इंदापूरला येता पण माझ्याकडे येत नाही. त्यामुळे मी कबुल केले होते, मी तुमच्याकडे चहा पिण्यासाठी येईन, त्यानुसार चहा पिण्यासाठी गेलो होते. ते आमच्यासोबतच आहेत, ते आमचे जुने सहकारीच आहेत, असे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

## लोकसभा का लढवली नाही पटेलांनी सांगितले खरे कारण

नागपूर । प्रतिनिधी

अनेक कार्यकर्ते आणि अजितदादा गटातील राष्ट्रवादीने मी निवडणूक लढवावी, अशी विनंती केली होती. भाजपाने सुद्धा आपण स्वतः निवडणूक लढवत असाल, तर विचार करता येईल, असे सांगितले होते. मात्र, राज्यसभेवर नियुक्ती झाल्याने मी २०३० पर्यंत खासदार असल्याने निवडणूक लढवली नाही, असे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते व खासदार प्रफुल्ल पटेल यांनी आज (दि.५) माध्यमांशी बोलताना स्पष्ट केले.



भंडारा मतदारसंघात भाजप-राष्ट्रवादी अनेक दिवस तिकिटावरून तिढा कायम होता. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची गोंदिया येथे सभा होणार आहे. महायुतीचे उमेदवार सुनील मेंढे यांना निवडून आणण्यासाठी सर्व पक्ष एकवटले आहेत. निश्चितपणे आमचा उमेदवार विजयी होईल, असा दावा पटेल यांनी केला.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# संशोधनाच्या सहकार्याने धोरणात्मक बदल व्हायला हवेत-डॉ. पराग काळकर

'यशस्वी'संस्थेच्या आयआयएमएसच्यावतीने 'व्यवस्थापनातील नाविन्यता आणि माहिती तंत्रज्ञान' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

संशोधनाच्या सहकार्याने धोरणात्मक बदल व्हायला हवेत, असे मत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र कुलगुरु डॉ.पराग काळकर यांनी व्यक्त केले. ते शुक्रवारी यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट सायन्स (आयआयएमएस) च्या वतीने 'व्यवस्थापनातील नाविन्यता आणि माहिती तंत्रज्ञान' या विषयावरील आंतरराष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन करताना बोलत होते. तंत्रज्ञान कितीही विकसित तंत्रज्ञानामुळे माणसांची जागा यंत्रे घेऊ लागले आहेत असे असताना नाविन्यतेचा दृष्टिकोन असणाऱ्यांनाच या तीव्र स्पर्धेत टिकता येईल, असे काळकर यांनी सांगितले. विविध उदाहरणांद्वारे त्यांनी बदलत्या जागतिक परिस्थितीबद्दल भाष्य करीत संशोधनाचे महत्व केवळ पेंटन्टपुरते मर्यादित न ठेवता प्रक्रिया, किंमती,

माणसे आणि धोरण निर्मितीमध्ये संशोधनाचा सहभाग व्हायला हवा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

या परिषदेत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, मलेशियाचे प्रेरदाना विद्यापीठ, नेपाळच्या पोखरा विद्यापीठाचे मुनि ग्लोब कॉलेज, मलेशियाचे म्हासा विद्यापीठ आणि इंडो युरोपियन एज्युकेशन फाउंडेशन मधील व्याख्याते, संशोधक आणि विद्यार्थी सहभागी झाले आहेत.

यावेळी आयआयएमएसचे संचालक डॉक्टर शिवाजी मुंढे, यशस्वी संस्थेचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी, हिताची एस्टिमो ब्रेक सिस्टम्स इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक अनिल खांडेकर, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संशोधन पार्क फौंडेशनच्या समर्थ उद्यम तंत्रज्ञान फोरमचे संचालक डॉ.सदाशिव पाधी यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. या परिषदेत



देश परदेशातील १३० संशोधन प्रबंध सादर करण्यात आले.

या परिषदेच्या पहिल्या दिवशी मलेशियाच्या प्रेरदाना विद्यापीठाचे प्रा.डॉ. सीरियाक देवासिया, नेपाळच्या पोखरा विद्यापीठाचे डॉ.गंगाधर दहाल,हिताची एस्टिमो ब्रेक सिस्टम्स इंडिया चे व्यवस्थापकीय संचालक अनिल खांडेकर,सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संशोधन पार्क फौंडेशनच्या समर्थ उद्यम तंत्रज्ञान फोरमचे संचालक डॉ. सदाशिव पाधी, ब्रेम्बो ब्रेक इंडिया कंपनीचे कण्ट्री हेड एच.आर.किशोर केंचे, मॉरिशसच्या ला सेंटीनेले ग्रुपचे सीईओ आरिफ सालारू, एम्डॉक्स चे वरिष्ठ तंत्रज्ञान व्यवस्थापक अनिल कुमार सिंग यांची व्याख्याने झाली. तर द्वितीय सत्रात संशोधन प्रबंधांचे सादरीकरण करण्यात आले. तसेच परिषदेच्या समारोप सत्रात आयआयएमएस च्या एमबीए व एमसीए विद्याशाखेच्या विद्यार्थ्यांना त्यांच्या उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरीसाठी प्रशस्तीपत्र व बक्षिस देऊन गौरवण्यात आले.हा बक्षीस वितरण समारंभ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शंतनुराव किर्लोस्कर अध्यासनाचे माजी प्रमुख आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी प्राध्यापक कॅप्टन डॉ. सी. एम. चितळे यांच्या हस्ते करण्यात आले.

# टिटेघर येथे वणवा लागून पाइपलाइनचे नुकसान



**पुणे । प्रतिनिधी**

भोर वणवा लागून शेतातील पिकांसह पाइपलाइनचे पाइप जळाले. वणवा लावणार्यावर कारवाई करून बाधित शेतकर्यास नुकसानभरपाई देण्याची मागणी होत आहे. टिटेघर (ता. भोर) येथे ही घटना सकाळी साडेअकरा वाजता घडली.

चिखलगाव बाजूकडून सकाळी आलेला वणवा टिटेघर येथील अनिल बबन निगडे यांच्या शेतात पोहोचला. या वणव्यात त्यांच्या शेतातील पाइपलाइन व पिकाचे अंदाजे ४० हजार रुपयांचे नुकसान झाले. स्थानिकांनी वेळीच वणवा नियंत्रणात आणल्याने मोठी दुर्घटना टळली. मागील ८ दिवासांपूर्वी देखील तुकाराम गायकवाड यांच्या शेतात वणवा लागून गव्हाचे पीक तसेच वीजपंपाचा स्टार्टर आणि केबल जळाली. परिसरात वारंवार वणवे लावण्याचे प्रकार घडत आहेत. वणवा लावणार्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी शेतकर्यांकडून होत आहे.

# पार्थ पवारांचा पराभव करणाऱ्या श्रीरंग बारणेंच्या प्रचाराला अजित पवार येणार ?

**पुणे । प्रतिनिधी**

अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांचा विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी पराभव केला होता. या पराभवाचे खापर तेव्हाच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मोदी लाटेवर फोडले होते. अजित पवारांसाठी ही लढाई अत्यंत महत्त्वाची आणि प्रतिष्ठेची होती. मात्र त्यात बारणे यांनी पार्थ पवार यांचा मोठा मताधिक्याने पराभव केला. तेच विद्यमान खासदार श्रीरंग बारणे मावळ लोकसभा महायुतीचे उमेदवार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा महायुतीचा घटक पक्ष असल्याने बारणे यांच्या प्रचाराला अजित पवार येणार का? अशी चर्चा रंगली आहे. नुकत्याच झालेल्या नियोजन बैठकीत राष्ट्रवादीच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी अजित पवारांनी मावळमध्ये एक सभा घ्यावी अस आवाहन केल आहे. पार्थ पवार यांचा पराभव करणारे बारणे यांच्या प्रचाराला अजित पवार येणार का हा प्रश्न विचारला जातो आहे.




मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे विरुद्ध शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात लढत आहे. सलग दोन टर्म खासदार राहिलेले श्रीरंग बारणे हे हॅट्रिक करण्यासाठी उत्सुक असून तशी तयारी त्यांनी दर्शवली आहे. तर दुसरीकडे पहिल्यांदाच लोकसभेची संधी मिळालेले संजोग वाघेरे यांनी प्रचाराची पायमूळ गेल्या काही महिन्यांपासून रोवण्यास सुरू केली आहेत. पुन्हा मावळचा गड उद्धव ठाकरे यांना मिळवून देण्यासाठी वाघेरे सज्ज झाले आहेत. दोन्ही उमेदवार स्वतःचा प्रचार करण्यासाठी स्टार प्रचारकांना त्याचबरोबर महायुती आणि महाविकास आघाडीतील नेत्यांना आणण्यासाठी प्रयत्नशील असतील. याच दरम्यान श्रीरंग बारणे यांच्या प्रचारासाठी मावळ लोकसभा मतदारसंघात महायुतीचा धर्म पाळत अजित पवार येणार का? अशी चर्चा सुरू आहे. अजित पवार यांचे सुपुत्र पार्थ पवार यांचा श्रीरंग बारणे यांनी २०१९ मध्ये झालेल्या लोकसभेत पराभव केला होता. हे अजित पवार अद्यापही विसरले नसतील. अजित पवारांच्या प्रतिष्ठेची लढाई म्हणून अवघ्या महाराष्ट्राचे लक्ष मावळ लोकसभेवर होतं. बारणे यांनी ही लढाई जिंकत पार्थ पवार यांचा पराभव केला होता.

# लोकसभा निवडणुकीसाठी ११ हजार ८९८ मतदान यंत्रांची सरमिसळ

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील मावळ, पुणे, बारामती आणि शिरुर लोकसभा मतदारसंघाच्या निवडणूकीसाठी जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ.सुहास दिवसे यांच्या उपस्थितीत जिल्ह्यातील ८ हजार ३८२ मतदान केंद्रांसाठी द्यावयाच्या ११ हजार ८९८ मतदान यंत्रांची जिल्हास्तरीय सरमिसळ (रँडमायझेशन) प्रकिया करण्यात आली.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या सरमिसळ प्रक्रियेच्यावेळी मावळचे निवडणूक निर्णय अधिकारी दीपक सिंगला, बारामतीच्या निवडणूक निर्णय अधिकारी कविता द्विवेदी, शिरुर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी मीनल



कळसकर, ईव्हीएम व्यवस्थापन समन्वयक अधिकारी रुपाली आवळे, जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी प्रमोद बोरवले आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील चार लोकसभा मतदारसंघाच्या आवश्यकतेनुसार ११ हजार ८९८ बॅलेट युनिट, ११ हजार ८९८ कंट्रोल युनिट आणि १२ हजार ७४९ व्हीव्हीपॅट यंत्रांची सरमिसळ (रँडमायझेशन) संगणकीय प्रणालीच्या माध्यमातून करण्यात आली. तत्पूर्वी राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींना जिल्हाधिकारी डॉ.दिवसे यांनी सरमिसळ प्रक्रियेची माहिती दिली.

सर्व मतदान यंत्रांची राजकीय पक्षांच्या उपस्थितीत प्रथमस्तरीय तपासणी पूर्ण करण्यात आली असून ते सुस्थितीत आहेत. या यंत्रांपैकी सर्व विधानसभा मतदारसंघातील मतदान केंद्राच्या १४१ टक्के बॅलेट आणि कंट्रोल युनिट, तर १५२ टक्के व्हीव्हीपॅट यंत्र देण्यात येणार आहेत. वितरणानंतर ही यंत्रे संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या स्ट्राँग रूममध्ये आणि पुणे लोकसभा मतदारसंघासाठीची यंत्रे भारतीय खाद्य महामंडळाच्या गोदामात सुरक्षा बंदोबस्तात ठेवण्यात येणार आहेत. त्या-त्या विधानसभा मतदारसंघात देखील मतदान यंत्रांची सरमिसळ प्रक्रिया करण्यात येणार आहे, असे डॉ.दिवसे यांनी सांगितले.

सरमिसळ प्रक्रियेच्या वेळी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे योगेश बाबर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षाचे गणेश नलावडे, भारतीय जनता पार्टीचे राजाभाऊ शेडगे, रिपब्लीकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) पक्षाचे अशोक कांबळे, भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे रमेश सकट, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अजित गव्हाणे, शिवसेनेचे राजू गवळी आदी राजकीय पक्षांचे प्रतिनिधी आणि निवडणूक प्रक्रियेशी संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# पुणे विद्यापीठात विद्यार्थ्यांचा निषेध

**पुणे । प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामधील आदर्श कॅन्टीनमध्ये असलेल्या 'भोजनगृह दक्षता समिती'च्या फलकावर संपर्क क्रमांक नसल्याने शुक्रवारी (५ एप्रिल) राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने फलकावर नंबर लिहून तसेच हार घालून प्रतिकात्मक निषेध व विरोध व्यक्त करण्यात आला.




गेल्या वर्षभरापासून विद्यापीठांमधील जेवणाचा प्रश्न गंभीर झालेला आहे. वारंवार मेस मधील जेवणामध्ये आळी , प्लास्टिक , झुरळे इत्यादी गोष्टी निघण्याचे प्रकार घडलेले आहेत. याला आळा घालण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने प्राध्यापकांचे सात सदस्य समिती व विद्यार्थ्यांचा समावेश असलेली एक समिती अशा दोन समित्यांची स्थापना केलेली आहे. परंतु सध्या विद्यापीठ प्रशासनाने फक्त प्राध्यापकांचे नावे असलेले फलकच सर्व मेसमध्ये लावले व विद्यार्थ्यांच्या नावाचा उल्लेख असलेले फलक लावले नाहीत. त्यासोबतच प्राध्यापकांचे संपर्क क्रमांक देखील दिलेले नाहीत. एखाद्या विद्यार्थ्याला भोजनाच्या दर्जासंदर्भात काही तक्रारी असेल तर ते संबंधित सदस्यांना कशा पद्धतीने संपर्क करतील असा प्रश्न यावेळी विद्यार्थ्यांनी केला.

यावेळी बोलताना राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेसचे महाराष्ट्र राज्याचे सचिव अक्षय कांबळे म्हणाले, राष्ट्रीय विद्यार्थी काँग्रेसच्या वतीने आज सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आदर्श कँटीन येथे प्रत्येकात्मक निषेध करण्यात आलेला आहे. आमची विद्यापीठ प्रश्नाला मागणी आहे की त्यांनी संबंधित फलक तात्काळ दुरुस्त करावेत त्याच्यामध्ये संपर्क क्रमांक टाकावेत व त्यासोबतच ज्या विद्यार्थी सदस्यांची भोजनगृह समितीवर निवड करण्यात आली आहे त्या विद्यार्थ्यांचे देखील नावांचे फलक तात्काळ लावण्यात यावेत.

# कळमोडीचे पाणी मिळणार कधी? चारा-पाण्याचा प्रश्न गंभीर

**खेड । प्रतिनिधी**

खेड तालुक्याच्या पूर्व भागातील गावांचा कळमोडी पाणी योजनेत समावेश नसल्याने ही गावे दुष्काळाने होरपळत आहेत. या भागात पावसाळ्यात पाऊस कमी पडत असल्याने उन्हाळ्यात येथील शेती व पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर होतो. कळमोडीचे पाणी मिळल्यास येथील शेतीसिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटून गावे टँकरमुक्त होतील. परंतु, याबाबत शासनस्तरावर कोणताही निर्णय झाला नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.



लोकसभा, विधानसभा किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये येथील पाणीप्रश्नावर फक्त भाषणबाजी व चर्चा होते. कळमोडीचे पाणी देण्याचे आश्वासन राजकीय नेते मंडळी देतात. परंतु, शासनाच्या उदासीन धोरणामुळे हा प्रश्न मार्गी लागलेला नाही. खेड तालुक्याच्या पूर्व भागातील वाफगाव, पूर, कनेरसर, वरूडे, गोसासी, गुळाणी, वाकळवाडी, चौधरवाडी, गाडकवाडी, चिचबाईगाव, जऊळके बु।। येथे पुरेसा पाऊस पडत नाही. ही गावे अवर्षणप्रवण क्षेत्रात येतात. यंदा वेळ नदीवरील बहुतांश बंधारे तसेच पाणवठे कोरडेठाक पडले आहेत. विहिरींनी तळ गाठला आहे. जनावरांना पुढील तीन महिने चारा व पाणी कसे द्यावे, असा प्रश्न शेतकर्यांच्या पुढे निर्माण झाला आहे. शासनाने या परिसरात लवकरात लवकर पाण्याचे टँकर सुरू करावेत, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

पूर्व भागातील तीव्र पाणीटंचाईबाबत तातडीने उपाय योजना सुरू करण्याची मागणी कळमोडी पाणलोट विकास संस्थेचे अध्यक्ष अशोक टाव्हरे, दिलीप माशेरे, महेश लोखंडे तसेच सामाजिक कार्यकर्ते अमर बोर्हाडे यांनी उपविभागीय अधिकारी जोगेंद्र कट्यारे व तहसीलदार प्रशांत बेंडसे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

# ३६०० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई : पोलिस अधीक्षक संजय जाधव

**बारामती । प्रतिनिधी**

बारामतीच्या अपर पोलिस अधीक्षक कार्यालयांतर्गत येणार्या बारामती, पुरंदर, इंदापूर व भोर तालुक्यांतील ३६०० जणांवर निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली आहे. अप्पर पोलिस अधीक्षक संजय जाधव यांनी ही माहिती दिली. बारामतीत पत्रकारांशी ते बोलत होते. या वेळी उपविभागीय पोलिस अधिकारी सुदर्शन राठोड, परिविक्षाधिन पोलिस उपअधीक्षक दर्शन दुगड, पोलिस निरीक्षक संतोष घोळवे, चंद्रशेखर यादव, गोरख गायकवाड आदी उपस्थित होते. पोलिसांच्या गेल्या दीड महिन्यातील कारवाईबाबत जाधव म्हणाले, बारामती विभागात पोलिसांकडून १५३ दारुबंदीच्या केसेस करण्यात आल्या आहेत. १९ ठिकाणी जुगारावर कारवाई करण्यात आली.



बारामती तालुक्यात ५७ लाख रुपयांचा गुटखा जप्त करत चार आरोपी गजाआड करण्यात आले. याशिवाय घरगुती गॅस व्यावसायिक सिलिंडरमध्ये भरण्याच्या कारवाईत साडेआठ लाखांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. इंदापूरात हॉटेलमध्ये झालेला गोळीबार आणि राजगड पोलिस ठाण्याच्या हद्दीत सराफाला लुटणे या दोन घटनांमध्ये मोक्काची कारवाई केली जात आहे. निवडणुकीच्या अनुषंगाने स्थानबद्धतेच्या तीन कारवाया करण्यात आल्या आहेत. निवडणूक कालावधीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ७७३ जणांची शस्त्रे जमा करून घेण्यात आली आहेत. चेकपोस्टवर परजिल्ह्यातून येणार्या वाहनांची तपासणी केली जात आहे. निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्थेला बाधा येऊ नये, याची काळजी घेतली जात आहे.

बारामती शहर व तालुक्यात वाहतूक विभागासाठी पोलिस निरीक्षक चंद्रशेखर यादव यांच्यावर जबाबदारी देण्यात आली आहे. बारामती शहरात वाहतूक कोंडीसह पार्किंग व अन्य प्रश्न आहेत. सध्या वाहतूक पोलिस प्रत्येक चौकात असतील. शहरभर त्यांची गस्त सुरू असेल अशी व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय निर्भया पथकाचे कामकाज यादव यांच्याकडे देण्यात आले आहे. प्रत्येक शाळा-महाविद्यालयाचा व्हॉट्सअॅप ग्रुप तयार करण्यात आला आहे. छेडछाड व अन्य घटनांना त्यामुळे आळा बसू शकेल.

शहरातील व्यावसायिकांनी पुढे येत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याची गरज जाधव यांनी व्यक्त केली. चोरी किंवा अन्य अनुचित प्रकार घडल्यास सीसीटीव्हीची मोठी मदत पोलिस खात्याला होते. त्यामुळे व्यावसायिकांनी या कामी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

# दुष्काळाच्या झळा आता तमाशाच्या बुकिंगलाही

**नारायणगाव । प्रतिनिधी**

यंदा राज्यात दुष्काळसदृश स्थिती असल्याने तमाशाची बारी बुकिंगवर परिणाम झाला आहे. नारायणगावचे तमाशा पंढरीमध्ये सुमारे ३५ फड मालकांनी कार्यालये थाटली आहेत. दरवर्षी या ठिकाणी फेब्रुवारी महिन्यात फड मालक आपली कार्यालये उभारतात. मार्च ते जून हे चार महिने विविध गावच्या यात्रा असल्याने तमाशाच्या बारीला सुगीचे असतात. यंदाच्या वर्षी राज्यात दुष्काळी स्थिती असल्याने तमाशा बारीच्या बुकिंगवर परिणाम झाला आहे. दुष्काळी स्थितीचा परिणाम यात्रा वर्गणीवर होत असल्याने गावची यात्रा तर आहे परंतु तमाशाचा खेळ ठेवायचा का नाही? असा विचार गावची यात्रा कमिटी करते. त्यातच स्वस्तात एखादा तमाशा मिळाला तर बघू असा प्रयत्न होतो.

तमाशा नगरीत तमाशाची



बारी ठरवायला आलेले यात्रेकरू अगदी कमी दरात तमाशाची बारी ठरवण्याचा प्रयत्न करतात. यंदा दुष्काळ आहे, गावात वर्गणी गोळा होत नाही. आमचा यंदा यात्रा उत्सव करण्याचा विचार नाही. साध्या पद्धतीने यात्रा भरवणार आहोत. तथापि फडमालकांचे व कलाकारांचे नुकसान होऊ नये म्हणून आम्ही इथे बारी ठरवायला आलोय. बारी स्वस्तात मिळाली तर तमाशा ठेवू अशी मानसिकता विविध यात्रा कमिटींची पाहायला मिळते.

एकंदरीत यंदाच्या वर्षी असणारी दुष्काळी परिस्थिती तमाशा कलाकारांसाठी अडचणीची ठरत आहे. ५० हून अधिक कलाकार, इतर कारागीर व कामगार असा सुमारे १०० लोकांचा लवाजमा फडमालकांच्या सोबत असतो. दुष्काळी परिस्थिती असल्याने तमाशाची बारी ठरवताना यात्रा कमिटीचे लोक कमी दरामध्ये बारी ठरविण्याचा प्रयत्न करीत असल्याने या कलाकारांना मानधन द्यायचे कसे? असा सवाल फडमालक विचारीत आहेत.

अंजली नाशिककर या फडाचे मालक संभाजीराजे जाधव म्हणाले, तमाशाला यंदाच्या वर्षी सुगीचे दिवस राहतील अशी आम्हाला अपेक्षा असल्याने कलाकार व इतर कामगारांना मोठ्या प्रमाणात उचल देऊन यंदाच्या वर्षी आम्ही तमाशाची बारी उभी केली आहे. परंतु, दुष्काळी परिस्थिती असल्याने विविध गावच्या यात्रा कमिटीचे प्रमुख तमाशा बुकिंग करायला आल्यावर कमी दरात तमाशा मिळावा अशी मागणी करतात. यंदा दुष्काळ आहे. आम्हाला सांभाळून घ्या. पुढच्या वर्षी जास्त पैसे देऊ अशी गळ ते घालतात. कमी दरात आम्ही तमाशाची सुपारी घेतली तर दुसर्याकडून घेतलेले पैसे कसे फेडायचे, कामगारांचा पगार कसा द्यायचा? असा प्रश्न आमच्या समोर उभा ठाकला आहे.

# अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी; उपाययोजना करण्याची मागणी

**बिबवेवाडी । प्रतिनिधी**

बिबवेवाडी परिसरातील गंगाधाम सोसायटीच्या प्रवेशद्वाराजवळील रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी चारचाकी व दुचाकी वाहनांचे अनधिकृत पार्किंग केले जात आहे. यामुळे परिसरात सकाळी व सायंकाळच्या वेळी वाहतुकीची कोंडी होत असल्याने वाहनचालकांससह रहिवाशांची गैरसोय होत आहे. महापालिका प्रशासन व वाहतूक पोलिसांनी ही समस्या सोडविण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.



महापालिकेच्या वतीने गंगाधम सोसायटीमध्ये हॉटेल मेघदूत ते गंगाधाम फेज -२ खंडेश्वर सोसायटीपर्यंत कोट्यवधी रुपये खर्चून रस्ता, पदपथ, सायकल ट्रॅक बांधला आहे. परंतु, मेघदूत हॉटेल ते गंगाधाम सोसायटीमधील फेज दोनच्या प्रवेशद्वारापर्यंत दुतर्फा दुचाकी व चारचाकी वाहनांचे अनधिकृतपणे पार्किंग केले जात आहे. त्यामुळे सकाळी व सायंकाळी या भागात वाहतुकीची कोंडी मोठ्या प्रमाणात

होत आहे. 'गगन गॅलेक्सी'मधील काही गाळेधारकांनी दुकानासमोर सोसायटीच्या पार्किंगच्या जागेवर पोटभाडेकरू ठेवल्यामुळे रस्त्यावर वाहने पार्किंग केली जातात. तसेच रात्री उशिरापर्यंत या ठिकाणी व्यवसाय चालू राहतात. वाढदिवसाच्या पार्ट्या, अनधिकृत खाऊ गल्ली आदींमुळे स्थानिक नागरिकांना दिवसेंदिवस त्रास सहन करावा लागत आहे. यावर वाहतूक पोलिस व महापालिकेच्या अतिक्रमण विभागाचा वचक नसल्याचे नागरिकांनी सांगितले. गगन गॅलेक्सी सहकारी गृहरचना संस्थेतील एका रहिवाशाने सांगितले की, आम्ही कोट्यवधी रुपये खर्च करून या सोसायटीत सदनिका घेतल्या आहेत. मात्र, सकाळी व सायंकाळच्या वेळी या ठिकाणी अनधिकृत पार्किंगमुळे वाहतूक कोंडी आहे, याबाबत प्रशासनाकडे तक्रार केल्यानंतर आम्हाला काही लोकांकडून दमदाटी केली जात आहे.

# धक्कादायक पोलिस कर्मचाऱ्याची गोळी झाडून आत्महत्या

**पुणे । प्रतिनिधी**

रात्री ड्युटीवर असताना खडक पोलीस स्टेशन अंतर्गत लोहियानगर पोलिस चौकीच्या वरती असलेल्या रेस्टरूममध्ये पोलिस कर्मचाऱ्याने गोळी झाडून आत्महत्या केली. शुक्रवारी सकाळच्या सुमारास ही घटना उघडकीस आली आहे.

भारत दत्ता आस्मर असे पोलिस कर्मचाराचे नाव आहे. आस्मर यांनी उठ चेलळश्रश १ वरील कार्बाईनने चार राउंड फायर करत आत्महत्या केली आहे. घटनास्थळी वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी भेट दिली आहे. असं काय प्रकार घडला असेल ज्यामुळे आस्मर यांनी हा तीक्ष्ण पाऊल उचलला याचा तपस खडक पोलीस करत आहे. या घटने नंतर खडक पोलीस स्टेशन, आस पास चा परिसर तसेच पुणे आयुक्तालयात तणावाचा वातावरण निर्माण झाला आहे.